


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आयपीएल सामना क्र.१०




लखनौ सुपरजायंट्स् विरुद्ध सनरायझर्स हैद्राबाद

वेळ : ७.३० वा. स्थळ : लखनौ

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ७ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १८८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## तो मला मारायला आला होता; मी त्यालाच मारले

# गजबजलेल्या आसरा चौकात भाचाने मामाचा गळा चिरला



सुराज्य/सोलापूर

**चेहऱ्यावर ना भीती ना अस्वस्थता, हात थरथर कापत नव्हते आणि आवाजही कुठे कापरा झालेला नव्हता. प्रत्येक हालचाल अगदी नेहमीचीच. कुठलाच गोंधळ नाही किंवा बडबड नाही. अत्यंत शांत बैठक. बोलताना उलट वाद नाही की विचारल्यानंतर वेडेवाकडे बोलणे नाही. 'का मारलं?' म्हणून विचारले... तर म्हणाला,' तो मला मारायला आला होता; मी त्याला मारले'...'दुसरं कोणी होतं का?'... 'नाही... मी एकट्यानेच मारले... दुसऱ्यांचा त्यात काय संबंध?' अशी कबुली देतानासुध्दा तो अत्यंत शांत होता. जणू काही घडलेच नाही; अशा आविर्भावात.**




ही कबुली देणारा आहे अवघ्या १७ वर्षांचा तरणाबांड पोरगा. त्याने त्याच्या नात्याने दूरचा मामा असणाऱ्या तरुणाचा सदासर्वकाळ गजबजलेल्या आसरा चौकात गुरूवारी भरदुपारी धारदार चाकूने वार करून खून केला. त्यानंतर सिव्हिल पोलीस चौकीमधील पोलिसांनी विचारल्यावर त्याने थेट कबुली देऊन शांत बसणे पसंत केले.

अजित मल्लिकार्जुन कोलार (वय २४, रा. कर्णिक नगर, सोलापूर) असे या घटनेत खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. मृत अजित आणि आरोपी हे नातेसंबंधातीलच असून मृत हा आरोपीचा दुरून मामा लागतो, असे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले.

### असा झाला खून

आसरा शॉपिंग सेंटरमधील एका गाळ्यात व्हिडिओ गेम सेंटरचे दुकान आहे. गुरूवारी दुपारी आरोपी हा त्या सेंटरमध्ये बसला होता. त्यावेळी मृत अजित कोल्हार त्याठिकाणी आला. पहिल्यांदा दोघांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. त्याचे रूपांतर शिवीगाळीमध्ये झाले. दोघेही एकमेकांच्या अंगावर धावून गेले. गच्चागच्ची झाली. त्यावेळी स्वत:ला सोडवून घेऊन आरोपी दुकानातून बाहेर पळाला. समोरच असलेल्या अंडाबुर्जीच्या गाडीवरचा कांदा कापायचा चाकू घेऊन तो परत आला. आल्या आल्या त्याने अजितच्या गळ्यावर चाकूने वार केला. वार वर्मी लागल्यामुळे रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. क्षणार्धात तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. जेव्हा त्याला सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेले; तेव्हा तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### मृतासोबतच आरोपी गेला सिव्हिल हॉस्पिटलला

व्हिडिओ गेमच्या गाळ्यात खून झाल्याची माहिती समजताच त्याठिकाणी बघ्यांची गर्दी झाली. गर्दीतील काहींनी एक रिक्षा बोलावली. रक्तबंबाळ अवस्थेतील अजितला त्या रिक्षात घातले. त्याच्या शेजारीच आरोपीसुध्दा बसला. तेव्हाही आरोपी अत्यंत शांत होता. पुढे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये अजितला दाखल केले; तेव्हाही आरोपी तिथेच थांबलेला होता. रिक्षाचालकाने आरोपीला सिव्हिल पोलीस चौकीत नेऊन बसवले. तेव्हा तेथील पोलिसांना तो आरोपी असल्याचे समजले.

### अजित होता फुल्ल नशेत

आरोपी आणि मृत अजित यांच्यात बुधवारी रात्री भांडण झाले होते. त्यावेळीसुध्दा प्रकरण मारामारीपर्यंत गेले होते. सोडवासोडवी झाल्यामुळे प्रकरण तिथेच थांबले होते. गुरूवारी दुपारी तीनच्या सुमारास आरोपी व्हिडिओ सेंटरमध्ये बसलेला असताना मृत अजित त्याठिकाणी गेला. त्यावेळी अजित नशेतच होता. व्हिडिओसेंटरमध्ये पुन्हा रात्रीच्या भांडणावरून वादावादी सुरू झाली. ही वादावादी वाढत जाऊन प्रकरण हाणामारीपर्यंत पोहचले. तेव्हा आरोपीने पळत जाऊन समोरच्या अंडाबुर्जीच्या गाडीवरून कांदा कापण्याचा चाकू आणला आणि अजितवर वार केले, अशी माहिती प्रत्यक्ष घटनास्थळावरून ऐकायला मिळाली.

### दोघांच्याही खिशात सापडला गांजा

मृत आणि आरोपी दोघेही सिव्हिल हॉस्पिटलमध्ये असल्याचे समजताच विजापूर नाका पोलीस त्याठिकाणी पोहचले. तिथे पहिल्यांदा आरोपीला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या पँटच्या खिशात गांजाच्या पुड्या सापडल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. मृत अजितच्या अंगावरील पँटच्या खिशातही गांजाच्या पुड्या सापडल्याचेही सांगण्यात आले.

---

### केंद्र सरकारचा मोठा निर्णय

## सीएनजी-पीएनजीचे दर कमी होणार




**मुंबई** : पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारने घरगुती नैसर्गिक वायूच्या किंमती निश्चित करण्याच्या नव्या सूत्राला मंजुरी दिली आहे.

सरकारच्या या निर्णयानंतर सीएनजी आणि पीएनजीसारख्या इंधनाच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे. सीएनजी, पीएनजीच्या दरात किमान १० टक्क्यांची कपात होण्याची शक्यता आहे. सरकार वर्षातून दोनदा घरगुती नैसर्गिक वायूच्या किमतींचा आढावा घेते. सरकारला पारीख समितीच्या शिफारशींवर निर्णय घ्यायचा असल्याने १ एप्रिल २०२३ रोजी गॅसच्या किमतींमध्ये कोणताही बदल झाला नाही.

## पतीने चारित्र्यावर संशय घेवून केला पत्नीवर चाकू हल्ला

सुराज्य/मोहोळ



मोहोळ शहरातील दत्त नगर येथे पतीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन गळयावर चाकूचा वार करित जिवे मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना चार एप्रील रोजी सकाळी दहा वाजणेच्या सुमारास घडली.

मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहितीनुसार रेशमा बाळू सरवदे यांच्या पतीस दारूचे व्यसन असल्याने दारू पिण्याच्या कारणावरून दोघात सारखे भांडन व्हायच म्हणून त्या मोहोळ येथे माहेरी त्यांच्या आईकडे मोहोळ शहरात दत्त नगर येथे येवून राहील्या. काही दिवसानंतर त्यांचे पतीही मोहोळ येथे येऊन राहिले सहा महीन्यापूर्वी मुलीच्या डीलीव्हरी साठी आईच्या ओळखीचे असणारे विजय वडते यांच्याकडून ६ हजार रुपये हात उसने घेतले होते. ते पैसे मागण्यासाठी वडते आईच्या घराकडे येत होते. ४ एप्रील रोजी सकाळी आठ वाजणे च्या सुमारास रेशमाचे पती बाळू जगन्नाथ सरवदे गावी जातो म्हणून घरातून निघून गेले. त्यानंतर सकाळी दहा वाजणेच्या सुमारास घरामध्ये रेशमा आई बहीन व इतर नातेवाई सोबत गप्पा मारत बसले असताना रेशमाचा पती बाळू सरवदे हा घरी येवून विजय रामा वडते हा तुझ्याकडे कशासाठी येतो तुझे व त्याचे काहीतरी लफडे आहे का असे म्हणत रेशमास तुला आता जिवंत सोडत नाही तुला मारूनच टाकतो तुला आज संपवून टाकतो असे म्हणून त्याच्या हातातील चाकूने रेशमाच्या गळयावर जोरात वार केला. त्यावेळी बहीन आई बहीनीचा नवरा जोरात ओरडले व बाळूला धरत असताना तो हिसका देऊन पळून गेला. गळयातून रक्तस्त्राव होवू लागला नातेवाईकांनी तातडीने रुग्णालयात दाखल केले. नंतर सोलापूर येथे रेफर करण्यात आले. रेशमा सरवदे यांनी त्यांचा नवरा बाळू जगन्नाथ सरवदे यांच्या विरोधात मोहोळ पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## तहसीलदारांचे आंदोलन मागे

### संप मिटला तरी सलग सुट्ट्यांमुळे सोमवारपासून कामावर




**सोलापूर** : सोलापूरसह राज्यभरातील २२०० नायब तहसीलदार आणि ६०० तहसीलदार यांनी ३ एप्रिलपासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले होते. राजपत्रित वर्ग दोन, नायब तहसीलदार या कार्यकारी पदाच्या विद्यमान ग्रेड-पे मुद्यांवरुन सुरू झालेला संप आश्वासनानंतर गुरुवारी (ता. ६) मागे घेण्यात आला.

सोलापुरात काम बंद आंदोलनाचा आज चौथा दिवस होता. त्यामुळे प्रशासकीय पातळीवरील बरीच कामे ठप्प झाली होती. सायंकाळी संप मागे घेण्यात आलेले जाहीर करण्यात आले मात्र, शुक्रवारपासून सलग तीन दिवस सुट्या असल्याने आता सोमवारीच काम सुरळीत होणार आहे. राज्य सरकारने १३ ऑक्टोबर १९९८ रोजी नायब तहसीलदार संवर्गाचा दर्जा वर्ग तीनवरुन वाढवून वर्ग दोन केला होता. मात्र वेतनवाढ केली नव्हती. मागील २५ वर्षांपासून राज्यातील नायब तहसीलदार वर्ग दोन या पदावर काम करतात, मात्र वर्ग तीनचे वेतन घेत आहेत. त्यामुळे नायब तहसीलदारांनाही इतर विभागांतील वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांएवढा ग्रेड पे वाढवून द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेने केली आहे. मुंबई येथे झालेल्या बैठकीत महासूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी नायब तहसिलदार राजपत्रित वर्ग २ यांचे ग्रेड पे ४८००/- रु. करण्याची मागणी अतिशय न्याय्य व आवश्यक असल्याचे सांगीतले आहे.

या अनुषंगाने महसूल विभागाकडून सकारात्मक अभिप्रायासह प्रस्ताव उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री यांच्याकडे पाठविला असून या विभागाचा पालक या नात्याने स्वत: हा प्रस्ताव तात्काळ मंजूर करण्यासाठी पाठपुरावा करीत असल्याचे सांगितले आहे. महसूलमंत्र्यांच्या आश्वासनावरून हा संप मागे घेण्यात येत असल्याचे तहसीलदार व नायब तहसीलदार संघटननेन कळविले आहे.

## रजिस्टरवर शिक्के मारण्यासाठी तीन हजारांची लाच घेताना एक्साईजच्या निरीक्षकासह तिघे 'एसीबी'च्या जाळ्यात

सुराज्य/सोलापूर



नवीन आर्थिक वर्षाच्या अनुषंगाने बार अ‍ॅड रेस्टॉरंटच्या स्टॉक रजिस्टर व ब्रँड रजिस्टर वर शिक्के मारण्यासाठी तीन हजारांची लाच घेताना एक्साईजच्या निरीक्षकासह तिघांवर लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली आहे. निरिक्षक संभाजी साहेबराव फडतरे, कॉन्स्टेबल प्रियंका बबन कुटे, सहा. दुय्यम निरीक्षक सिध्दाराम अंदेनप्पा बिराजदार असे राज्य उत्पादन शुल्क विभागातील कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

अधिक माहिती अशी की, तक्रारदार यांचे बार अ‍ॅड रेस्टॉरंट असून बार अ‍ॅड रेस्टॉरंटच्या अनुषंगाने असलेले स्टॉक रजिस्टर व ब्रँड रजिस्टरमध्ये नवीन आर्थिक वर्षाच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभाग येथून शिक्के मारून घेण्यासाठी (प्रमाणित करुन) देण्याकरिता विभागातील महिला जवान प्रियांका कुटे व बिराजदार यांनी स्वत:साठी व साहेबांसाठी चार हजारांची लाचेची मागणी केली. निरीक्षक फडतरे यांनी सदर लाच रक्कमेमध्ये तडजोड करुन तीन हजार रुपये रक्कम कुटे यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यानंतर सापळा रचून केलेल्या कारवाईमध्ये कुटे यांनी लाच रक्कम स्वीकारली. याप्रकरणी तिन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार, पोलिस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस अंमलदार सोनवणे, घाडगे, मुल्ला, किनगी, पवार, घुगे व चालक उडानशिव यांनी केली.

## शार्दुलचे वादळ; कोलकात्याचा आरसीबीवर विराट विजय

**मुंबई** : लॉर्ड शार्दूल ठाकूर याच्या वादळी अर्धशतकानंतर फिरकीच्या तडाख्यात आरसीबीचा संघाची दाणादाण उडाली. एकतर्फी सामन्यात कोलकात्याने आरसीबीचा ८१ धावांनी पराभव केला. कोलकात्याने दिलेल्या २०५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना आरसीबीने १२३ धावांपर्यंत मजल मारली.

आरसीबीला संपूर्ण २० षटकेही फलंदाजी करता आली नाही. कोलकात्याच्या फिरकीसमोर आरसीबीचा डाव कोसळला.

२०५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना कर्णधार फाफ डु प्लेसिस आणि विराट कोहली यांनी वादळी सुरुवात केली. पहिल्या चेंडूपासूनच दोघांनी कोलकात्याच्या गोलंदाजावर हल्लाबोल केला. पण विराट कोहली बाद झाल्यानंतर आरसीबीची फलंदाजी ढासळली. महत्वाचे तीन फलंदाज बाद झाल्यानंतर आरसीबीची फलंदाजी कोलमडली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




वाळू माफियाराजची वाळू सरकली...

कल्याण
269-72-660

मेन बाजार
338-40-334

## प्राचार्य पदासाठी बनावट कागदपत्रे; माजी आमदारावर गुन्हा दाखल



**कुर्डूवाडी** : कुर्डूवाडी येथील के. एन. भिसे महाविद्यालय व विनायकराव पाटील सायन्स कॉलेजच्या प्राचार्य पदाच्या भरतीसाठी बोगस व बनावट कागदपत्र तयार करून शासनाची व संस्थेची फसवणूक केली म्हणून कोर्टाच्या आदेशानुसार कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात राजाभाऊ जयवंत सुसलादे रा. कुर्डूवाडी यांनी फिर्याद दाखल केली आहे.

संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग उर्फ विनायकराव गणपतराव पाटील (रा. कुर्डूवाडी) यांच्या विरोधात कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहिती अशी की माढा तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के. एन. भिसे आर्टस, कमर्स आणि विनायकराव पाटील सायन्स कॉलेज भोसरे येथील प्राचार्य रावसाहेब रामचंद्र पाटील दि.२८ फेब्रुवारी २०२२ रोजी सेवानिवृत्त झालेल्या नंतर प्राचार्य पद भरणेसाठी संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडे पद भरतीसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणेसाठीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविला जातो. संस्थेचे अध्यक्ष पांडूरंग उर्फ. विनायक गणपत पाटील यांनी प्राचार्य पद भरती संदर्भात आरोपीने स्वतः आवश्यकती कागदपत्रांची पूर्तता करुन योग्य प्रक्रिया राबवली असल्याचे भासवून प्राचार्य पद भरतीसाठीचा प्रस्ताव मार्च २०२२ मध्ये ऑनलाईन पोर्टलवर सादर केलेला होता. या प्रस्तावाची प्रत व त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रे फिर्यादीस राजाभाऊ सुसलादे मिळाल्या नंतर कागदपत्रांची पडताळणी केली असता धर्मादाय उपायुक्त सोलापूर कागदपत्राचा संदर्भ नसल्याचे समजले. संस्थेचे अध्यक्ष विनायक पाटील यांनी प्राचार्य पदभरतीसंदर्भात ऑनलाईन पोर्टलव्दारे शिक्षण संचलनालय, पुणे यांचेकडे पाठविलेल्या प्रस्तावातील बदल अर्ज व दोन्ही बदल अर्जातील तारीख, नावे, सहया याबाबत पडताळणी केलेवर सोलापूर येथील धर्मादाय उपआयुक्त यांचे कोर्टातील बदल अर्ज क्रमांक ७००/२०१४ खरा, योग्य व कायदेशीर असून बदल अर्ज क. ७००/२०१९ हा बोगस व बनावट स्वरुपाचा आहे लक्षात आले. सोलापूर येथील धर्मादाय उपआयुक्त यांचे कोर्टातील बदल अर्ज क्रंमाक ७००/२०१९ हा अस्तित्वा असताना त्यामध्ये नमुदकेले प्रमाणे बदल करून स्वतः कुर्डुवाडी येथील संस्थेत बसुन फेरफारक खाडाखोड करून बदल अर्ज क्रमांक ७००/२०१९ हा तयार केल्याने संस्थेचे अध्यक्ष पांडूरंग उर्फ विनायक गणपत पाटील यांनी संस्था संचलित के. एन. भिसे आर्ट्स, कमर्स आणि विनायकराव पाटील सायन्स कलेज भोसरे येथे प्राचार्य पद भरती संदर्भात शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे बोगस व बनावट बदल अर्ज, कागदपत्रे सादर करुन शासनाची व संस्थेची व माझी फसवणूक करुन खोटी व बनावट कागदपत्रे तयार करून गंभीर स्वरुपाचा गुन्हा केलेला आहे.

के. एन. भिसे आर्टस, कमर्स आणि विनायकराव पाटील कॉलेज प्राचार्य पद भरती संदर्भात शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण, पुणे यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावातील कागदपत्रे खरी असल्याचे प्रमाणपत्र संस्थेच्या अध्यक्षांनी लेटरहेडवर स्वतः सही करून प्राचार्य पदासाठी स्वतःच फेरबदल करून, खाडाखोड करून बोगस व बनावट कागदपत्रे प्राचार्य पद भरतीचे प्रस्तावात दाखल करून गंभीर स्वरुपाचा गुन्हा केलेला आहे.

### सुरुवातीला कुर्डूवाडी पोलिसांनी दखल घेतली नाही

के.एन. भिसे महाविद्यालय व विनायकराव पाटील सायन्स कॉलेजच्या संस्थापक अध्यक्ष माजी आमदार विनायकराव पाटील यांनी प्राचार्य पदासाठी बनावट कागदपत्र तयार केली म्हणून तक्रार दाखल करण्यासाठी गेले असता याची दखल घेतली नाही. यानंतर सोलापूर येथील पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण पोलीस यांच्याकडे रजिस्टर पोस्टाने तक्रार दाखल केली होती. परंतु याचीही दखल घेतली नसल्याने माढा कोर्टातून कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उशिरा सुचलेले शहाणपण

राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने वाळू धोरणात जो आमूलाग्र बदल केला, त्याचे सामान्य जनतेतून, विचारवंतांमधून स्वागत केले जात आहे. मात्र, पैशावर पैशांची माडी बांधणाऱ्या लोकांमध्ये प्रचंड संताप दिसून येत आहे मग ते बिल्डर लॉबी असेल. वाळू माफिया असतील किंवा वाळूवर लोणी काढत वळू बनलेले राजकारणी लोक असतील. नदीतील बेसुमार वाळू उपशामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होत असल्याची ओरड पर्यावरणप्रेमींकडून सातत्याने झाली. घसा बसल्यानंतर त्यांना शांत राहण्याखेरीज पर्याय उरलेला नव्हता. शासनाचे पर्यावरण खाते तर तोंडावर बोट ठेवूनच असायचे. कारण सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. वाळूच्या जोरावर अनेकजण राजकारणी बनले. एका बोटीतून अनेक बोटी घेतल्या. मनगटशाहीचे लोक कामावर घेतले. प्रशासनातील सरकारी बाबूंना हाताशी धरून मनमानीपणे वाळू चोरून कोट्यवधींची माया गोळा केली. त्यावर इलेक्शन लढवले जाऊ लागले. कोकणसारख्या सागर किनारी असलेल्या वाळूवर सर्वच पक्षांमधील आमदारांच्या पोळीवर रोज तूप पडत असते. चोरीची वाळू रोखायला कुणी आला तर सरकारी अधिकारी असतील किंवा पोलीस. त्यांच्या अंगावर गाडी घालण्याची वाळू माफियांची हिम्मत बळावली होती. अगदी सहज व माफक दरात मिळणारी वाळू व गौण खनिज विद्यमान स्थितीत तेवढ्या सुलभतेने मिळत नाही, हे वास्तव आहे. हा बदल शासन आणि प्रशासनाच्या गेल्या १५ ते २० वर्षांच्या काळातल्या कठोर नियमांमुळे व त्यातून उदयास आलेल्या माफियागिरीतून झाला, असे म्हणावे लागेल. कागदावरच्या नियमांचा गाजावाजा करून अनेक पळवाटा शोधत गौण खनिज व वाळूची अवैध मार्गाने बेसुमार लूट झाली. महसूल विभागाची परवानगी नसतानाही राज्यात उत्खनन झाल्याची अनेक उदाहरणे समोर आली. जेथे गौण खनिज व वाळू घाट तेथे माफियाराज असे समीकरणच राज्यात तयार झाले. गब्बर झालेल्या माफियांनी पर्यावरणाचे मोठे नुकसान करतानाच अनेकांचे जीवही घेतले आहेत. शासनाचा महसूल बुडविला आहे. प्रशासकीय व राजकीय व्यवस्थेच्या आशीर्वादानेच फोफावलेला हा धंदा आता बेलगाम झाल्यावर शासनाला नवे धोरण आणण्याचे शहाणपण सुचले आहे. ते उशिराचे असले तरी परिणामकारक असावे, अशी नागरिकांची अपेक्षा असणे



रास्तच ठरते. गौण खनिज व वाळू संदर्भातल्या नियमांचा प्रवासही मोठा रंजक आहे. सुसूत्रता आणण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने २०१८ आणि २०१९ मध्ये नवे नियम तयार केले होते. या सुधारित अधिसूचनेमध्ये वाळू उपशाच्या परवानगीसाठी जिल्हा सनियंत्रण समितीला जादा अधिकार देण्यात आले. पर्यावरणीय परवानगीनंतरच वाळू उपसा परवाने मिळतील, परवानाधारकांना उपशाच्या ठिकाणी सर्वकाळ सीसीटीव्ही कॅमेरे लावणे बंधनकारक राहील आदी तरतुदी त्यात होत्या. इतके सारे बदल केल्यानंतरही अपेक्षेनुरूप काहीच घडले नाही. उलट नव्या धोरणाचीच गरज व्यक्त व्हायला लागली. यावरून बदलविण्यात आलेल्या नियमांमधून पळवाटा शोधण्यात आल्या किंवा अंमलबजावणी काटेकोरपणे झाली नाही, हे सिध्द होते. यासाठी व्यवस्थेलाच जबाबदार धरावे लागते. अवैध मार्गाने झालेल्या उपशामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे. भविष्यात ही संपत्ती वाऱ्यावर सोडली जाणार नाही, यासाठी कायम सतर्क राहणे गरजेचे आहे. त्यात कुठेतरी कमतरता राहिल्यास लुटारू लगेचच संधीचा गैरफायदा घेतात आणि स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करतात. त्यामुळे कालांतराने ती जटिल समस्या होऊन बसते. अवैध गौण खनिज व वाळू उत्खननाचा फटका विशेषतः नदी परिसरातील रहिवाशांना तसेच शेतीला बसतो. नदीपात्राची रुंदी, खोली वाढल्याने गावकऱ्यांना महापुराचा सामना करावा लागत आहे. पर्यावरणाचा समतोल ढासळतो. शासकीय महसूल बुडण्यासह सामान्यांचे संसारही महापुरात बुडतात. लबाडी करणारे भ्रष्ट लोक पूर ओसरल्यावर पुन्हा त्याच ठिकाणी उत्खनन करतात. हे थांबण्याची नितांत गरज आहे. नव्या धोरणातून ते साध्य व्हायला हवे. नव्या धोरणानुसार, वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी मोक्याच्या ठिकाणी तपासणी नाके राहणार आहे. प्रत्येक वाळू गटांमधील वाळू वाहतुकीसाठी एकच रस्ता राहील. ५० लाखांपेक्षा जास्त किंमत असणाऱ्या वाळू गटाच्या लिलावासाठी वजनकाटा बसवण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. ग्रामपंचायतींना वाळू गटाच्या लिलावाची २५ टक्के रक्कम मिळणार आहे. नव्या धोरणात वाईट प्रवृत्ती शिरता कामा नये, याची काळजी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांना घ्यावी लागेल. अंमलबजावणी पारदर्शकपणे झाली तर हे धोरण लोकाभिमुख होईल, अन्यथा पुन्हा पहिले पाढे पंचावन्न.

गुडफ्रायडे

# येशूची वधस्तंभावरील प्रीती

**मानवाच्या मुक्तीकरिता मानवातील प्रितीस्तव येशूने वधस्तंभावर समर्पण केले. रक्त ओतल्यावाचून पापविमोचन नाही म्हणून मानवाच्या मुक्तीकरिता येशूने स्वतःचे पवित्र रक्त वाहिले. प्रीती : प्रभू येशूंनी शिष्यांना एकमेकांवर प्रेम करावयाला शिकविले. तुम्ही आपल्या वैऱ्यांवरही प्रीती करा. जे तुम्हाला शाप देतात, त्यांना आशीर्वाद द्या. जे तुमचा द्वेष करतात, त्यांचे बरे करा आणि जे तुमचा छळ करतात. तुमच्या पाठीस लागतात. त्यांच्यासाठी प्रार्थना करा. (मत्तय ५:४४) मी तुम्हास नवी आज्ञा देतो की, 'तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी. जशी मी तुमच्यावर प्रीती केली, तशी तुम्हीही एकेकांवर प्रीती करा. तुमच्यातील प्रीती पाहून सर्व तुम्हाला ओळखतील की, 'तुम्ही माझे शिष्य आहात. (योहान १३ : ३४, ३५ ) असे येशूने सांगितले. आज कुटुंबामध्ये, समाजामध्ये व देशामध्ये एकमेकांवरील प्रीती थंडावली आहे. नवीन युगातील मानवाने जगावे एकमेकांच्या कल्याणासाठी, हा संदेश प्रभू येशूने त्यांच्या जीवनातून शिष्यांना दिला.**

- - - - - - - - - - - - - - - - -

**शांती :** प्रभू येशूला शांतीचा अधिपती म्हटले आहे. (यशया ९:६) त्याच्या शांतीचा अंत असणार नाही. मानवी जीवन आज असुरक्षित आहे. कुटुंब, समाज व देशामधील शांती लोप पावत आहे. आपल्यावर कोणीतरी हल्ला करेल, अशा प्रकारचे दहशतीचे सावट आज सर्वत्र दिसत आहे. त्यामुळे मानवी जीवन असुरक्षित आहे. आज जागतिक युध्दाची परिस्थिती निर्माण झाली. अशा वेळी शांतीची प्रकर्षाने जाणीव होत आहे.


**आत्मत्याग :** येशूने म्हटले, 'जर कोणी माझ्या मागे येऊ पाहतो तर त्याने आत्मत्याग करावा व दररोज स्वतःचा वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे (लुक ९:२३) वधस्तंभ हे आत्मत्यागाचे प्रतीक आहे. आज मानवामध्ये स्वार्थी प्रवृत्ती बळावली आहे. मानवी दृष्टिकोन स्वकेंद्रित झाला आहे. दुसऱ्याला मदत करण्याकरिता आत्मत्यागाची आवश्यक असते. त्यामधून मानवाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो.'

**अभिमान :** 'संत पैलाने गलतीकरास लिहिले आहे. प्रभू येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभाशिवाय कशाचाही अभिमान बाळगणे माझ्या हातून न होवो. आज संपत्ती, सौंदर्य व शिक्षण याकरिता एकमेकांमध्ये स्पर्धा आहे आणि प्रत्येकाला या गोष्टींचा अभिमान आहे. परंतु संत पौल म्हणतात मांडू याकरिता जे दुःख प्रभू येशूने सहन केले. त्या वधस्तंभाशिवाय आज अभिमान बाळगणे न होवो. ख्रिस्ताने मला बाप्तिस्मा करावयास नव्हे तर सुवार्ता सांगावयास पाठविले. पण ख्रिस्तांचा वधस्तंभ व्यर्थ होऊ नये म्हणून मी वाक्चातुर्याने सांगण्यास पाठवले नाही.

**दुःख सहन :** वधस्तंभ हे प्रभू येशूच्या त्यागाचे व समपणाचे प्रतीक आहे. मरणप्राययातना वधस्तंभावर सहन करीत असताना त्यांचे वधस्तंभावरील सप्तोद्गाराचे आज बहुतेक चर्चमध्ये चिंतन व मनन केले जाते. येशूचे वधस्तंभावरील उद्गार,

**प्रथमोद्गार :** हे बाप्पा यांना क्षमा कर, कारण हे काय करतात त्यांना हे समजत नाही. (लुक २३ : २४ ) क्षमा अनेक पापांची रास झाकते. दया व क्षमा हे प्रीतीचे उगमस्त्रोत आहे.

**द्वितीयोद्गार :** मी तुला खचित सांगतो, तू आज मजबरोबर सुख लोकांत असशील. वधस्तंभावर पश्चाताच करणाऱ्या अपराध्याला मिळालेले प्रभू



येशूचे हे अभिवचन आहे.

**तृतियोद्गार :** बाई पाहा, हा तुझा पुत्र व शिष्य पाहा. ही तुझी आई (लुक २३:३९) आपल्या पश्चात आपल्या आईची जबाबदारी त्यांनी आपल्या प्रियशिष्यावर सोपविली.

**चतुर्थोद्गार :** माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास? (मार्क १५:३३,३४) पिता आणि पुत्रातील ताटातूट किंबहुना विरहाचे हे उद्गार आहेत.

**पंचमोद्गार :** मला तहान लागली आहे. (योहान १९:२८) तहान दोन प्रकारची असते. आध्यात्मिक तहान, देहिक तहान.

**षष्टमोद्गार :** पूर्ण झाले आहे. (योहान १९ :३) ज्या कार्याकरिता मानवी देह धारण करुन या जगामध्ये मानवाचे तारण किंवा मुक्तीची योजना पूर्ण करण्याकरिता येशू आले होते, ते कार्य वधस्तंभावरील समर्पणाद्वारे पूर्ण केले. जीविताच्या साफल्याचा हा उद्गार आहे.

**सप्तमोद्गार :** हे पाहून मी माझा आत्मा तुझ्या हाती सोपवून देतो (लुक २३ : २६) देहाचे अपण वधस्तंभाच्या वेदीवर केले. आत्म्याचे समर्पण पिता परमेश्वराला दिले आणि मानव मुक्तीकरिता हे समर्पण अद्वितीय ठरले. मानवाच्या मुक्तीकरिता मानवाला शुध्द व पवित्र करण्याकरिता प्रभू येशूने वधस्तंभाच्या वेदीवर कोकराप्रमाणे समर्पण केले. वधस्तंभावरील सप्तोद्गार म्हणजे मानवी भावनांचे इंद्रधनुष्य आहे. यामध्ये क्षमाशीलता, अभिवचन, कृतज्ञता, विरह, तृषातंता, साफल्य, समर्पण या मानवी भावनांचे सप्तरंग आपणास आढळतात. मानवाच्या मुक्तीकरिता प्रभू येशूने वधस्तंभाच्या वेदीवर निष्कलंक व निर्दोष रक्त वाहिले. याबाबत पूव कल्पना असून सुध्दा सर्व दुःख, अपमान सहन केले. त्यांनी उक्ती व कृतौद्गार मानवाला मानवतेचा संदेश दिला. प्रभू येशूच्या जीवनात पावित्र्य, त्यांचे तिसऱ्या दिवशी मरणावरील विजय हे त्यांचे अमरत्व व त्यांचे देवत्व सिध्द करते.

**- रेव्ह. सतीश गडकरी, सोलापूर.**

- - - - - - - - - - - - - - - - -

टुडेज् ब्लॉग

# काजूला नाही भाव, देवा शेतकऱ्यांना पाव!

महाराष्ट्रात अवकाळी संकट, हवामानातील सतत होणारे बदल यामुळे कोकणातील सर्वच फळपिकांवर त्याचा परिणाम झाला आहे. या वर्षी आंबा, काजू पीक विपुल प्रमाणात येईल, असे वाटले होते; परंतु प्रत्यक्षात तसे घडले नाही. आंबा, काजू, कोकम या फळांचे चांगले पीक येईल, हा अंदाजही चुकला. प्रचंड पाऊस, वाढत जाणारा आणि कमी-अधिक होणारा उष्मा, मध्येच कडाक्याची होणारी थंडी यामुळे सर्वच पिकांच्या बाबतीत अस्थिर वातावरण तयार झाले. यामुळे येणारे पीक आलेच नाही. 'काजू'चे तर अतोनात नुकसान झाले. आंबा हंगाम या वातावरणामुळे लांबणीवर पडला आहे. बागायतदार शेतकरी आंबा, काजू बागायतीवर होणारा खर्च किती आणि येणारे उत्पादन किती? या प्रश्नाचाच विचार करीत आहेत. 'काजू बी'च्या बाबतीत काजूचा मोहर मधल्या काळात करपून गेला. नव्याने मोहोर आला, 'काजू बी' तयार झाले; परंतु 'काजू बी'ला येणारा दर गेली अनेक वर्षे कमी-अधिक होत राहिला आहे.

'काजू बी'च्या हमीभावाचा विषय कधीच चर्चिला जात नाही. महाराष्ट्रातील इतर भागात त्यांच्या त्यांच्या भागातून उत्पादीत होणाऱ्या पिकांना हमीभाव मिळावा म्हणून शेतकरी संघटित होतात. संघटित झालेले शेतकरी हमीभाव मिळावा म्हणून लढत राहतात; परंतु असंघटित कोकणातील शेतकरी आजवर कधीही संघटित झालेले नाहीत. संघटित होण्याच्या ते विचारातही नाहीत. यामुळेच खरं तर वर्षानुवर्षे फार मोठे नुकसान होत राहिले आहे. इतक्या वर्षांनंतरही आंबा विक्री रुमालाआडच होत आहे. आंबा दलाल ठरवतील आणि सांगतील तोच दर. आंबा दलालाकडून आंब्याच्या पेटीची किती पट्टी येईल, हे बागायतदार शेतकऱ्याला ठरवता येत नाही, सांगताही येत नाही. आजही कोकणातील आंबा बागायतदारांची आंबा विक्री दलालांच्याच हाती आहे. कोरोना काळात एक नवीन आंबा विक्री व्यवस्था तयार झाली. कोकणातील आंबा बागायतदारांकडून थेट बागेत येऊन आंबा खरेदी करू लागलेत. यामुळे आंबा व्यवसायाच्या



विक्री व्यवस्थेतील एक मोठा बदल घडला आहे. या नव्या थेट विक्री व्यवस्थेने आंबा बागायतदार आणि आंबा खरेदी करणारा दलाल ही व्यवस्था उरली नाही. थेट विक्री व्यवस्थेतून आंबा बागायतदारांनाही त्याचा फायदा झाला आहे.

गेली तीन-चार वर्षे अशा थेट विक्री व्यस्थेतून आंबा विक्री होते. मात्र, 'काजू बी'च्या बाबतीत आजही केवळ चर्चाच होत आहे. वास्तविक 'काजू बी'ला हमीभाव मिळायलाच हवा होता; परंतु शासनाकडे संघटिततेची मागणी कधीच झालेली नाही.


गोवा राज्याने 'काजू बी'ला हमीभाव देण्याचे जाहीर केले. यानंतर कोकणातील काजू बागायतदार शेतकऱ्यांनाही वाटू लागले की, आपण संघटित होऊन महाराष्ट्र सरकारकडे यासंबंधीची मागणी केली पाहिजे. कोकणातील 'काजूगराची वेगळी टेस्ट' आहे. जेव्हा कोकणात काजूगराचे पीक येते, तेव्हाच आफ्रिका, मलेशिया या देशांतूनही मोठ्या प्रमाणावर काजू आयात होतो. यामुळे कोकणातील या काजूला फार दरच मिळत नाही. सर्व काही 'काजू बी' खरेदी करणाऱ्या व्यावसायिकांवर काजूचे मार्केट अवलंबून राहाते. 'काजू बी'चा दरही ठरावीक मर्यादित राहिला, तरच काजू बागायतदार, 'काजू बी'वर प्रक्रिया करून काजूगर उत्पादित करणारे काजू कारखानदार आणि 'काजू बी' खरेदी करणारे काजू व्यावसायिक, व्यापारी या सर्वांच्याच दृष्टीने काजूचा व्यवसाय आणि काजू बागायतदार शेतकरी यातून वाचेल. अलीकडे काजूगरालाही खूप मागणी आहे. मात्र, ठरावीक मर्यादेपलीकडे जेव्हा काजूगराची विक्री सुरू होते, तेव्हा मात्र कोकणातील काजूगराच्या विक्री व्यवस्थेलाही लगाम बसतो. 'काजू बी'चा वाढत जाणारा दर परवडत नाही. म्हणून मग काही काजूगराच्या कारखानदारांनी प्रक्रिया उद्योग सोडून दिल्याचे विदारक; परंतु वास्तव चित्र समोर येते. गेल्या काही वर्षांत कोकण कृषी विद्यापीठाने काजूच्या बाबतीत नवनवीन संशोधन करून काजूच्या नवनवीन जाती विकसित केल्या आहेत. यातही पारंपरिक असलेल्या काजू बी'चा दरही निश्चितच वेगळा मिळू शकतो; परंतु नवीन संशोधनातून निर्माण केलेल्या उत्पादित होणारी 'काजू बी' आणि जुन्या गावठी म्हणून संशोधित असणाऱ्या 'काजू बी' यात खूपच मोठा फरक आहे. जुनी काजूची झाडं ही फार कमी प्रमाणात उत्पादन देतात आणि उशिरानेही धरतात. यामुळे वेंगुर्लेत २, ३, ४, ७ अशा संशोधित काजूची लागवड केली जाते. यातून चार-पाच वर्षांत दामदुप्पट 'काजू बी'चे उत्पादन होते. यामुळे या नवीन 'काजू बी' लागवडीवर भर देण्यात आला आहे.

आजही कोकणातील काजू बागायतदार शेतकरी संघटित नाही. कोकणातील काजू बागायतदार शेतकऱ्यांनी संघटित होऊन हमीभावासाठी प्रयत्न केले पाहिजेत. महाराष्ट्र सरकारनेही कोकणातील बागायतदार शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार केला पाहिजे. यासाठी कोकणातील सर्वच पक्षीय लोकप्रतिनिधींनीही 'काजू बी'च्या या विषयात संघटितपणे सरकारसमोर गेले पाहिजे. तरच बागायतदार शेतकरी टिकू शकेल.

**- संतोष वायंगणकर.**

जन्म हा अखेरचा

## कायानुग्रहस्थल - २



हे भगवंता, इथे या, स्थिर राहा आणि आम्हाला सदैव संमुख राहा, अशी प्रार्थना करुन प्राणप्रतिष्ठापना केली जाते. या संस्कारानंतर मूर्तीकडून भक्तांना अनुग्रह प्राप्त होऊ लागतो. भगवान शिव अव्यक्त असले तरी मूर्तिरुपाने भक्तांवर अनुग्रह करतात. त्याप्रमाणे शिवयोगदेखील आपल्या देहाच्या द्वारे लोकांवर अनुग्रह करतो. मूर्ती हे ईश्वराचे शरीर आहे आणि सद्गुरुचे शरीर ही मूर्ती आहे. म्हणून जशी ईश्वराच्या मूर्तीची पूजा केली जाते तशीच सद्गुरुंच्या, शिवयोग्याच्या शरीराची पूजा केली जाते. ईश्वर मूर्तीत आहे की नाही, हा प्रश्न महत्वाचा नाही. ईश्वर सर्वत्रच आहे, परंतु मूर्तीत तो विशेषत्वाने प्रकटलेला असतो. आगपेटी तुमच्या खिशात असते, परंतु जोपर्यंत तुम्ही घर्षण करीत नाही, तोपर्यंत तिथे अग्नी प्रगट होत नाही. अस्तित्त्वात असणे आणि प्रगट होणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. ईश्वर अणू-रेणूंत व्याप्त आहे. त्याचे प्राकट्य मात्र मूर्तीतून होत असते. शिवयोगी आपल्या शरीराच्याद्वारे अनुग्रह करतो म्हणून तो कायानुग्राहक होय.

**शिव: शरीरयोगेऽपि यथा संगविवर्जित: । तथा योगी शरीरस्थो नि:संगो वर्तते सदा ।। १७.७ ।।**

ज्याच्या सोबत आपण राहतो त्याचा गुण किंवा दोष आपल्याला लागत असतो. सत्संगामुळे सद्गुण अंगी बाणतात तर कुसंगामुळे दोष अंगी लागतात. मनुष्याला संग तर करावाच लागतो. म्हणून ज्यांच्याकडे सद्गुण आहेत आणि आपल्यापेक्षा अधिक ज्ञान आहे, अशा सज्जनांची संगत धरावी. ज्या लाकडापासून, शिळेपासून, धातूपासून मूर्ती घडवली जाते, त्या लाकडात, शिळेत, धातूत काही ना काही दोष असतोच, मग मूर्तीत प्रविष्ट होणाऱ्या ईश्वराला त्या दोषांचा स्पर्श होतो काय, याचा या श्लोकात विचार केला आहे. ज्या शिळेपासून शिवलिंग बनते तो शिळा 'जड' असते. जडाची व्याख्या अशी केली जाते.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## वादविवादांचे वाढते प्रदूषण रोखावे

केंद्रातील आणि राज्यांतील सरकारांविरोधात सत्तेबाहेरील राजकीय पक्षांचे नेते एकजूट करू पहात आहेत. एकत्र येऊ पाहणाऱ्या प्रत्येक पक्षाचे एकमेकांशी मतैक्य होत नाही, काही पक्षांतील नेत्यांचे स्वपक्षातही आपापसात मतभेद आहेत. हे जनतेला कळून चुकले आहे. त्यामुळे त्याचा फायदा अर्थात सत्ताधारी पक्षाला होणे अपेक्षित आहे. महाराष्ट्रातील सत्तांतरानंतर दोन्ही बाजूंच्या नेत्यांकडून एकमेकांविरोधात आरोप प्रत्यारोप करताना नेते मंडळी शक्तिप्रदर्शनाचे सामने व गौरव यात्रांचे आयोजन करीत आहेत. सत्तेविरुद्ध आघाडी करून लढू इच्छिणारे पक्षनेते त्याच सभेच्या व्यासपीठावर आपले मित्र पक्ष आणि त्यांच्या नेत्यांविरोधात मते किंवा नाराजी व्यक्त करीत आहेत. तरीही सत्ताधाऱ्यांच्या विरोधात वज्रमूठ उभारण्याचे निर्धार करीत आहेत. त्यातील खरेखोटेपणा लवकरच उघड होईल असे वाटते.

पक्षीय शक्तिप्रदर्शनात एकमेकांचे वाभाडे काढणे हेच मुद्दे ठेवले जाताहेत कारण सभा, मोर्चे, मिरवणुका ह्या स्व-प्रसिद्धीसाठी काढल्या जातात. लोकांच्या जगण्या मरण्याच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. लोकांचे प्रश्न, समस्या काय आहेत, लोकांचे प्राधान्यक्रम काय आहेत, यांचे नेत्यांना सोयरसुतक नसते. परंतु सामान्य लोकही आपले वैयक्तिक व प्रापंचिक प्रश्न विसरून शक्तिप्रदर्शन, भावनिक सोहळे, मिरवणुका यांमध्ये सामील होतात याचे आश्चर्य वाटते. पूर्वी मोर्चे, मिरवणुका, सभा, निदर्शने, उपोषणे यांचे आयोजन बहुधा विरोधकांतर्फे केले जात असे. सध्या सत्ताधारी पक्ष देखील याच मार्गांचा अवलंब करताना दिसून येत आहेत. देशातील हवामानबदल, सर्वत्र होत असलेली अनिर्बंध बांधकामे यामुळे वाढलेल्या वातावरणातील प्रदूषणात पक्षीय नेते वादविवादांची भर घालून राजकीय प्रदूषणसुद्धा वाढवीत आहेत. त्यास जनता कंटाळली आहे. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी आपापली कामे बाजूस सारून राज्यातील राजकीय वातावरण गढूळ करीत आहेत. म्हणूनच लोकांची सहनशीलता, संयम ठरावीक मर्यादेबाहेर जाणार नाही याचे भान प्रत्येक राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांनी राखायला हवे.

**- राजन पांजरी, जोगेश्वरी.**

# या भ्रष्टाचाराची चौकशी होणार का?

मुंबई ही आर्थिक राजधानी असल्याने मुंबई महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या आपल्या हाती याव्यात यासाठी सर्वच राजकीय पक्षांचा डोळा मुंबई महापालिकेच्या तिजोरीवर असतो. तब्बल ५२ हजार कोटींचा विक्रमी अर्थसंकल्प आणि ८८ हजार कोटींच्या विविध बँकांमध्ये ठेवी, यामुळे कुठलाही राजकीय पक्ष असो, मुंबई महापालिकेतील सत्ता काबीज करण्यासाठी नेहमीच उत्सुक असतो. १९९६ सालापासून शिवसेनेच्या (त्या काळची शिवसेना) हाती मुंबई महापालिकेच्या किल्ल्या होत्या. मात्र, २०१७ साली झालेल्या निवडणुकीत भाजपने सत्तेत भाग न घेता बाहेरून पाठिंबा दिला होता. त्यामुळे शिवसेना हीच काय ती महापालिकेचे स्वारस्य करत होती. आता त्या कालावधीतीलच भ्रष्टाचार कॅगने बाहेर काढल्यामुळे मुंबईकरांच्या पैशाची कशी आम लूट सुरू होती हे दिसून येते.

मुंबई महापालिकेच्या कामांची कॅगने केलेल्या चौकशीमध्ये अनेक धक्कादायक बाबी उघड झाल्या असून तब्बल ८ हजार ४८५ कोटींचा भ्रष्टाचार उघड झाला आहे. कॅगचा अहवाल हा केवळ २८ नोव्हेंबर २०१९ ते ३१ ऑक्टोबर २०२२ या कालावधीतील असून यामध्ये कोविडची कामे नाहीत. केवळ ७६ कामांमध्ये ८ हजार ४८५ कोटींचा हा घोटाळा उघड झाला आहे. मुंबई महापालिकेतील ९ विभागांतील ७६ कामांमधील १२ हजार कोटींच्या घोटाळ्यावर कॅगने जे विश्लेषण केले आहे, त्यावरून स्पष्ट दिसते आहे की, मुंबई शहरात काय लूटमार चालली होती.



यात निविदेविना काम दिले गेले, ठरावीक निविदेपेक्षा जास्त काम दिले गेले, निविदा पडताळणी विनाकाम दिले आहे, निविदा अटी-शर्ती भंग आहे, निविदेमध्ये फेरफार आहे, निविदा एकत्रीकरण म्हणजे माल कमिशन पण आहे आणि निविदा अपात्र असलेल्यांना काम पण दिले गेले आहे. सगळ्यात भयंकर म्हणजे सिस्टमिक चेंज म्हणजे निविदेमध्ये फेरफार करण्यात आले आहेत. काही ठिकाणी चार कंपन्या सांगून निविदा दिल्या गेल्या, पण ती एकच कंपनी आहे. काही ठिकाणी तर पात्र नसलेल्यांनाच काम देण्यात आले आहे. ही काही कामांची चौकशी आहे, याच कालावधीतील सर्व विभागातील कामांची चौकशी झालेली नाही. सर्व कामांचीही पडताळणी कॅगने केलेली नाही. त्यामुळे याच कालावधीतील सर्व कामे, सर्व विभागातील कामे आणि सर्व ठेकेदारांची ही लुटमारीची पध्दत होती.

पालिकेने दोन भागांमध्ये २० कामे, २१४ कोटींची निविदा न काढताच दिली. ४ हजार ७५५ कोटींची ६४ कामे कंत्राटदारांना दिली, पण त्याचा करारच करण्यात आला नाही. त्यानंतर ३ हजार ३५५ कोटींची तीन वेगवेगळ्या विभागाची १३ कामे ही निविदेमध्ये दिली आहेत. त्याची पडताळणी करण्यासाठी थर्ड पार्टी ऑडिटची व्यवस्थाच नाही. पारदर्शकतेचा अभाव, निष्काळजीपणा, ढिसाळ नियोजन आणि निधीचा गैरवापर या बाबी यातून उघड झाल्या आहेत. भूखंडाची खरेदी ३३९.१४ कोटी, तीन मलनिस्सारण प्रक्रिया केंद्रासाठी खर्च ११८७.३६ कोटी, मुंबईतील ५६ रस्त्यांच्या दुरुस्तीचा खर्च २२८६.२४ कोटी, सहा सांडपाणी प्रकल्पांवर खर्च १०८४.६१ कोटी, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांवरील खर्च दहा १०२०.४८ कोटी या कामांच्या खर्चावर विशेषकरून कॅगकडून आक्षेप घेण्यात आला आहे.

नुकत्याच मुंबई महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार भ्रष्टाचाराच्या विविध प्रकरणात गेल्या काही वर्षांत ५५ कर्मचारी सेवेतून बडतर्फ करण्यात आले, तर १३४ कर्मचाऱ्यांना निलंबित केले गेले. त्यामुळे मुंबई महापालिका आणि भ्रष्टाचार हे समीकरण तसे नवीन नाही. कोरोना काळात सुमारे साडेतीन हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. कोरोना ही आपत्कालीन परिस्थिती असल्याने या खर्चाची चौकशी होऊ शकते का? याबाबत कायदेशीर विभागाचा सल्ला घेण्यात येणार आहे. त्यामुळे कोरोना काळात झालेल्या खर्चासाठी जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांना तूर्तास तरी दिलासा मिळाला आहे. मात्र अन्य कामात कॅगने ठेवलेला ठपका हे येत्या निवडणुकीपूर्वी समोर येईलच. कॅगची निष्पक्ष चौकशी झाली, तर याचे राजकीय परिणामही दूरगामी होतील यात शंका नाही.

**- अल्पेश म्हात्रे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# गौतमी पाटीलच्या कार्यक्रमात सौम्य लाठीमार

## पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर कार्यक्रम सुरळीत



सुराज्य/वेळापूर

वेळापूर येथील गौतम पाटीलच्या कार्यक्रमात पहिल्या गाण्यावरच बेभान होऊन नाचत असतानाच कार्यक्रमात काही तरुण नाचू लागल्याने कार्यक्रमात व्यत्यय झाला. पोलिसांनी शांततेचे आवाहन करूनही तरुणांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने पोलिसांनी प्रेक्षकात घुसून नाचणाऱ्या व हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणांनावर सौम्य असा लाठी मार केला. त्यांनंतर कार्यक्रम सुरळीत पार पडला.

बुधवारी रात्री वेळापूर पालखी मैदान येथे अर्धनारी नटेश्वर यात्रा सोहळयानिमित्त यात्रा कमिटीच्या वतीने गौतमी पाटील यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला दोन हजार च्या आसपास महिलांची व पुरुषांची आणि तरुणांची पंधरा ते सोळा हजाराच्या वर प्रेक्षकांनी पालखी मैदान तुडुंब भरले होते. गौतमी पाटील यांच्या कार्यक्रमासाठी अर्धनारी नटेश्वर यात्रा कमिटीच्या वतीने उत्तम असे नियोजन केले होते. कार्यक्रमासाठी उंच व भव्य असे स्टेज बनवण्यात आले होते तर स्टेज व प्रेक्षक यांच्यामध्ये अंतर ठेवून संपूर्ण स्टेज चारी बाजूने बॅरेकेट लावून वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव हे स्वतः कार्यक्रमाच्या शेवटपर्यंत उपस्थित होते त्याचबरोबर २५ पोलीस व होमगार्ड यांच्यासमवेत कडक बंदोबस्त ठेवल्याने हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणांना वर अंकुश ठेवण्यासाठी ब्रॅरेकेट व प्रेक्षकांमधून पोलीस उभा केल्याने गाण्यावर नाचण्यासाठी उतावीळ असलेल्या तरुणांना पोलिसांची अडचण झाली होती.

रात्री आठ तीस वाजता गौतमी पाटील यांचे स्टेजवर आगमन होताच राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर यांच्या हस्ते गौतमी पाटील यांचा सन्मान करण्यात येऊन उत्तमराव जानकर यांच्या हस्ते श्रीफळ फोडून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

जवळ जवळ दोन तास कार्यक्रम चालला त्यामध्ये गौतमी पाटील यांच्यासह या पथकातील आठ ते नऊ तरुणींनी १५ ते २० गाण्यावर अदाकारी सादर केली. तर गौतमी पाटील यांनी चार बहारदार अशी गाणी नाचून ठेका धरून तरुणाईला घायाळ केले. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, माजी सरपंच विमलताई जानकर, जि प सदस्य बाळासाहेब धाईंजे, विष्णू कोणत्या नारनवर सरपंच उंबरे दहेगाव युवराज झंजे सरपंच मेडद युवा नेते पैलवान दत्ता मगर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष अजित बोरकर, पांडुरंग वाघमोडे माजी जिल्हा नियोजन समिती सदस्य, ज्ञानेश्वर मुंडफणे, काकासाहेब पाटील कचरेवाडी उपसरपंच, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, संदीप माने देशमुख , सौ अश्विनी भानवसे, डॉक्टर जयंत चव्हाण, तानाजी जगदाळे, मोहन कचरे, विष्णुपंत गोरड, मच्छिंद्र गोरड, विकास देशमुख, साजिद सय्यद, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजीकाका चव्हाण, यात्रा कमिटीचे अध्यक्ष मिलिंद सरतापे, कार्याध्यक्ष विनायक माने, खजिनदार जावेद मुलाणी, उपाध्यक्ष धनंजय शिवपूजे, जीवन जानकर, अमोल पनासे यांच्यासह १६ ते १७ हजार प्रेक्षक गौतमी पाटीलच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.



## रोजा इफ्तारच्या माध्यमातून एकोपा : सरदेशपांडे

सुराज्य/सोलापूर

जात-पात आणि धर्म न मानता जनतेने शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सामाजिक एकोपा राखावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथे रमजान सणाच्या निमित्ताने रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते.

यावेळी पोलीस अधीक्षक सरदेशपांडे बोलत होते. आज काही विघ्नसंतोषी मंडळी समाजा - समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम करत आहे. परंतु त्याला थारा न देता जनतेने जातीपातीच्या पलीकडे जाऊन एकमेकांना बंधुत्वाच्या भावनेने पाहिले पाहिजे. त्यामुळे समाजात शांतता नांदण्यास मदत होते, असेही पोलीस अधीक्षक सरदेशपांडे म्हणाले.

रमजान महिन्यामध्ये केवळ मुस्लिम बांधवच नव्हे तर बोरामणीच्या पंचक्रोशीतील सर्व धर्मीयांसाठी रोजा विस्तार पार्टीचे आयोजन केले जाते. या माध्यमातून एकमेकांना भेटण्याची आणि बोलण्याची संधी मिळते ,असे गावचे ज्येष्ठ नागरिक सैफन शेख गुरुजी म्हणाले.

या कार्यक्रमास अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव ,उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप, तालुका पोलीस स्टेशनचे नामदेव शिंदे, नव्याने हजर झालेले सहा पोलीस अधीक्षक नयोमी साटम, सहा. उपविभागीय अधिकारी रोहिणी बनकर, यांच्यासह सरपंच प्रकाश आवटे पंचायत समितीचे सदस्य धनेश अचलारे ,पोलीस पाटील महादेव पाटील, भारत कवडे ,केदार विभुते, नाना भोसले, रवी मस्के ,रफिक मुजावर, औदुंबर कवडे, भगवान भोसले ,गौस शेख, वजीर मुजावर, सैफन फुलारी यांच्यासह अन्य ट्रस्टींचे पदाधिकारी तसेच हिंदू - मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## स्वर्गीय पंडित देशमुख पुण्यतिथीनिमित १११ जणांचे रक्तदान

**मोहोळ** : मोहोळ येथील स्वर्गीय पंडित देशमुख यांच्या १८ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १११ जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. ऐन उन्हाळयाच्या तोंडावर जय महाराष्ट्र प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या या रक्तदानाच्या उपक्रमामुळे गरजूंना मदतीचा हात मिळणार आहे. रक्तदान शिबिराच्या प्रारंभी माजी उपसभापती बाळासाहेब गायकवाड, ज्येष्ठ नेते पद्माकर देशमुख व माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांच्या हस्ते स्व. पंडित देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त प्रतिमा पूजन करून रक्तदान शिबिराला सुरुवात करण्यात आली. यावेळी भाजपाचे नेते संजय क्षीरसागर, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष सतीश काळे, किरण शिंदे, नगरसेवक सत्यवान देशमुख, महादेव गोडसे, महेश देशमुख ,चंद्रकांत गोडसे, नागेश थिटे, अमोल गायकवाड, गणेश गायकवाड,प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विक्रम देशमुख, भारत नाईक, किशोर वस्त्रे, अजय कुर्डे, संदीप चवरे, संतोष बिराजदार, संजय पडवळकर, सुरेश राऊत, महादेव इंगळे, सुमित पवार, गणेश क्षीरसागर ,सर्फराज सय्यद,दादा सरवदे, सुलतान शेख, संग्राम देशमुख, सतीश पाटील, सचिन सुरवसे, गणेश केवळे, किरण पोपळकर ,नागेश मोटे, स्वप्निल शिंदे, बिटू देशमुख पिंटू बरकडे, नितीन देसाई, पप्पु चौधरी, अमीर शेख, सुशांत पाटील, आनंद मोरे, विकास वाघमोडे, श्रेयश पवार, गणेश व्यवहारे आदींसह जय महाराष्ट्र प्रतिष्ठानचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोहोळ येथील शिवशंभो रक्तपेढीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात मोहोळ शहरासह तालुक्यातील १११ जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. शेवटी आभार संयोजक विक्रम देशमुख यांनी मानले.

## एमआयटी ज्युनिअर कॉलेज केगाव सोलापूर येथे मोफत ब्रिज कोर्स

**सोलापूर** : एमआयटी ज्युनिअर कॉलेजने सालाबाद प्रमाणे यंदाही दहावी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी १० एप्रिल पासून विशेष ब्रिज कोर्सचे आयोजन केले केले असल्याचे प्राध्यापक डॉक्टर स्वप्नील सेट यांनी सांगितले. के गाव येथील ज्युनिअर एम आय टी कॉलेजमध्ये नुकत्याच दहावीच्या परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांकरिता या कोर्सची आयोजन केलेले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना अकरावी विज्ञान व वाणिज्य शाखा मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांना मोफत मार्गदर्शन केले जाते. विशेष करून सी इ टी. जे ई.नीट इत्यादी परीक्षा बद्दल विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येते एकूण ३० दिवसाचा हा कोर्स मोफत असून विद्यार्थ्यांनी या कोर्सचा लाभ घ्यावा असे आव्हान प्रा. डॉक्टर स्वप्नील शेठ यांनी केले.सदर कोर्स दिनांक १० एप्रिल २०२३ पासून सुरू होत आहे. सोलापूर शहर व परिसरातील विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे माहिती परिवारातर्फे करण्यात आले आहे.

## सांगोला बाजार समितीत छाननीत आठ अर्ज नामंजूर

**सांगोला** : सांगोला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत आज छाननी होऊन त्यामध्ये आठ अर्ज नाम मंजूर झाले असून आता १८ जागेसाठी १२७ अर्ज मंजूर झाले आहेत माघार घेण्याची अंतिम मुदत २० एप्रिल असून त्यानंतर अंतिम चित्र स्पष्ट होईल. सहकारी संस्थेत अकरा जागेसाठी %९ अर्ज मंजूर झाले आहेत ग्रामपंचायत मतदार संघात चार जागेसाठी ३५ अर्ज तर व्यापारी मतदारसंघात दोन जागेसाठी दहा व हमाल तोलार मतदार संघातील एका जागेसाठी तीन अर्ज राहिले आहेत नामंजूर अर्ज पुढील प्रमाणे तानाजी तुकाराम खांडेकर तानाजी गणपत कुमठेकर सुरज दिवाकर बनसोडे सविता चंद्रकांत मोहिते संजय शिवाजी पाटील सुनीता पांडुरंग भजनावळे विमल लक्ष्मण मिसाळ शशिकांत सुबराव गडहिरे.

## गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**सोलापूर** : कुमठा नाका येथे असलेल्या प्रताप झोपडपट्टीत राहणाऱ्या मनोज राजू बाडीवाले (वय-३०) या इसमाने राहत्या घरी अज्ञात कारणावरून गुरुवारी दुपारी साडेतीन वाजता सुमारास गळफास घेऊन घेतला. ही बाब नातेवाईकांच्या लक्षात आली असता, नातेवाईकांनी बेशुद्ध अवस्थेत त्यास उपचार करता शासकीय रुग्णाला दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मयत झाल्याचे वैद्यकिय सूत्राने सांगितले. याघटनेची प्राथमिक नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

## जिल्हा समाजसेवा मंडळाच्या चौदा संचालकाचा जामीन फेटाळला

**सोलापूर** : माजी मंत्री स्वर्गीय दिनानाथ कमळे गुरुजी यांनी स्थापन केलेल्या सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाच्या चौदा संचालकाचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने गुरुवारी फेटाळला.

संस्थेत शिक्षक भरती करता यावे,तसेच केवळ स्वतःच्या अर्थिक फायद्यापोटी अल्पसंख्यांक मंत्रालय महाराष्ट्र शासनाकडून अल्पभाषिक कन्नड दर्जाचे प्रमाणपत्र मिळविणेसाठी संचालक मंडळाने स्वतःच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यात खाडाखोड करुन शासन दरबारी खरे असल्याचे भासवून प्रमाणपत्र मिळविले. तसेच संस्थेखाली शाळेत १४ लोकांची शिक्षकपदी नेमणूक करुन अंदाजे २ कोटी ७५ लाख रुपयाचा फायदा करुन घेत, शासनाची व जनतेची गंभीर फसवणूक केली.

याप्रकरणी पुंडलिक ऊर्फ प्रकाश लायप्पा कोळी, चनगोंडा गुरुसिध्दप्पा हविनाळे, विठ्ठल कामागोंडा पाटील, महादेव धरेप्पा कमळे, बुऱ्हाणद्दीन अमिनसाब जमादार, सलाप्पा रेवाप्पा अंकलगी, तुकाराम लायप्पा कोळी, संदेश पुंडलिक ऊर्फ प्रकाश कोळी, रचना पुंडलिक ऊर्फ प्रकाश कोळी, उमाकांत बापुराव डांगे, लकण्णा सोमण्णा कोळी, बसवंत महादेव भरले, काशिनाथ नामदेव कोळी, भारती पुंडलिक ऊर्फ प्रकाश कोळी या संचालक मंडळाने अटकपूर्व जामीनसाठी जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. संचालक मंडळानी संगनमताने समाज विधातक कृत्य केले असून, सखोल तपास होणे गरजेचे आहे, असे ताशेरे ओढत वरील संचालक मंडळांच्या अटकपूर्व जामीन फेटाळला.यात फिर्यादी नागेश बिराजदार तर्फे अड. नागेश खिचडे, यांनी, आरोपीतर्फे ड. शशि कुलकर्णी तर सरकारतर्फे ड. शितल डोके यांनी काम पाहिले.

## मंदिरातील दागिने चोरी करणारा विधीसंघर्षग्रस्त बालक ताब्यात

सुराज्य/सोलापूर

देवीच्या मंदिरातील सोन्या-चांदीचे दागिने चोरी करणारा विधीसंघर्षग्रस्त बालककास अवघ्या काही तासात गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले.

याबाबत अधिक माहिती अशी की, दि.३१ मार्च रोजी सायंकाळी साडेआठ वाजता ते दि.१ एप्रिल २०२३ रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या दरम्यान राघवेंद्र नगर जुना विडी घरकुल येथील जय ओंकार नवरात्र महोत्सव व सांस्कृतिक मंडळ येथील बंद देवी मंदिराच्या खिडकीतून आत प्रवेश करून मंदिरामध्ये देवीचे आभूषणे व दागिने कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करून घेऊन गेल्याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात माहिती प्राप्त झाली.त्या अनुषंगाने पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त यांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शाखेकडील अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करून शोध घेण्याबाबत सूचना दिल्या. त्यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांनी गुन्हे शाखेकडे अधिकारी व आमदार यांना मार्गदर्शन करून दि.४ एप्रिल रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक महाडिक व त्यांचे पथक असे मिळून गुन्हे करणारे आरोपींचा शहर हद्दीत घेत असताना जुना विडी घरकुल याठिकाणी एक संशयित इसम मिळून आला,त्याचे नाव व पत्ता विचारले असता तो विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे समजून आले. त्याची अंगझडती घेतली असता,त्याच्या ताब्यात सोने व चांदीचे आभूषणे व दागिने मिळून आले.



त्या विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेऊन विश्वासात घेत चौकशी केली असता त्याने राघवेंद्र नगर जुना विडी घरकुल येथील जय ओंकार नवरात्र महोत्सव व सांस्कृतिक मंडळ येतील बंद देवी मंदिरातून चोरी केली असल्याचे सांगितले.याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून,बेचाळीस हजार आठशे रुपये किमतीचे आभूषणे व सोन्याचे दागिने दोन पंचा समक्ष जप्त करून त्या विधीसंघर्षग्रस्त बालकास पुढील कार्यवाही करिता एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## बक्षीहिप्परगे सोसायटीत बक्षीबुवा पॅनेलचा विजय

सुराज्य/सोलापूर

बक्षीहिप्परगे (ता. द. सोलापूर) विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी निवडणुकीत सरपंच प्रा. विश्रांत गायकवाड, माजी सरपंच अंकुश माने, शिवाजी निकम, बाबासाहेब माने या विरोधी गटाचा धुव्वा उडवत माजी सरपंच बाबूराव चव्हाण, माजी पंचायत समिती सदस्य तुकाराम कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामदैवत बक्षीबुवा महाराज शेतकरी विकास पॅनेलचे सर्व बारा उमेदवार प्रचंड मताधिक्क्याने विजयी झाले.

गेल्या अनेक वर्षाची एकहाती सत्तेची परंपरा जपत सोसायटीचे वर्चस्व अबाधित ठेवले. निवडून आलेले सर्व संचालक मंडळाचे माजी सरपंच बाबूराव चव्हाण व पंचायत समितीचे माजी सदस्य तुकाराम कोळेकर यांनी अभिनंदन करुन सत्कार करण्यात आला.

निवडून आलेले संचालक मंडळ पुढीलप्रमाणे - संतोष बाबूराव चव्हाण, दिगंबर मल्हारी जाधव, महादेव देविदास खांडेकर, शिवाजी रामचंद्र राठोड, हुसेन गफूर शेख, शेकूंबर महिबूब शेख, गणपत दाजी शिंदे, शंकर लक्ष्मण यादव, रमकाबाई बाबूराव चव्हाण, संगीता शंकर व्हनमाने, लक्ष्मण नरसू माळी, रमेश गणपत चव्हाण या सर्व विजयी उमेदवारांचे पॅनेल प्रमुख शेतकरी सभासदवर्ग व ग्रामस्थांच्यावतीने शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.

या विजयासाठी विद्यमान ग्रामपंचायत सदस्य बालाजी यादव, प्रा. हनुमंत पवार, प्रा. लक्ष्मण महाडिक, अकबर शेख, राम जाधव, हाजी इलाहीबक्ष तुळजापुरे, बाळू जाधव, सुरेश सिद्धे, मनोज नातू पवार, मनोज किसन राठोड, शिवाजी लालू पवार, नामदेव भानुदास माळी, ज्ञानेश्वर पवार, अंबादास शंकर राठोड, रतिलाल राठोड यांनी परिश्रम घेतले.

## सोलापुरी चादरांची सांस्कृतिक परंपरा जपली

**सोलापूर** : सोलापुरी चादरांची सांस्कृतिक परंपरा शतकांपासून चालू आहे,सोलापुरच्या समृध्द सांस्कृतिक वारसा दर्शवताना,ह्या चादरांचा व सोलापुरच्या प्रदेशाच्या ओळखेशी संबंध आहे.त्यांच्या तपशीलबध्द डिझाइन,उजळलेल्या रंगांचा आकर्षण आणि अद्वितीय गुणवत्ता यांच्यामुळे सोलापुरी चादरांची भारतात आणि त्याच्या पलीकडेल जाणीव वाढली आहे.पारंपारिक भारतीय चादर,सोलापुरी चादर,गीता टेक्सटाइल्स अशा दूरदृष्टी टेक्सटाइल कंपनींच्या माध्यमातून हे काम पुन्हा उभारले जाते.हिरेमठ यांच्या स्थापनांतर्गत गीता टेक्सटाइल्स ही कंपनी सोलापुरी चदरांची सांस्कृतिक परंपरा जपून घेत आहे आणि टेक्सटाइल उद्योगाला आधुनिक स्पर्श देत आहे.चादरांच्या सौंदर्यपूर्ण आणि रंगबिरंगी कलाकृती,चादर हे कापूस आणि ऊन यांचे मिश्रण असते,ज्याचा उष्णता,सजवट आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील प्रतिरोधाच्या प्रतीकाचा वापर केला जातो.

## लोकनेते स्व.ब्रह्मानंद मोरे समाजसेवा प्रतिष्ठानचे आदर्श पुरस्कार

### ९ एप्रिलला मान्यवरांच्या हस्ते वितरण

सुराज्य/अक्कलकोट

कुरनूर (ता.अक्कलकोट) येथील लोकनेते स्व. ब्रह्मानंद कृष्णात मोरे यांच्या २४ व्या पुण्यस्मरणानिमित्त देण्यात येणारे विविध क्षेत्रातील आदर्श पुरस्कार जाहीर झाले आहेत.या पुरस्कारांचे वितरण ९ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता राणी निर्मला राजे कन्या प्रशाला अक्कलकोट येथे करण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे व कार्याध्यक्ष विनोद मोरे यांनी दिली.या कार्यक्रमास खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांचे दिव्य सानिध्य लाभणार असून त्याचे उद्घाटन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते होणार आहे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माळशिरसचे आमदार राम सातपुते हे राहणार आहेत.यावेळी स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी,

स्वामी समर्थ मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे,राष्ट्रवादीचे तालुका दिलीप सिध्दे,माजी नगराध्यक्ष डॉ. सुवर्णा मलगोंडा,नगरसेवक अशपाक बळोरगी, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे,ॲड. शरद फुटाणे, मल्लिकार्जुन पाटील, मल्लिनाथ स्वामी, राजीव माने, यशवंत धोंगडे, मल्लिनाथ साखरे, उत्तम गायकवाड, महिबूब मुल्ला, सद्दाम शेरीकर, शिवशरण जोजन, मोतीराम राठोड,महेश हिंडोळे, चंद्रकांत इंगळे आदींची उपस्थिती राहणार आहे.यावेळी ॲड.सुरेशचंद्र सूर्यवंशी (जीवन गौरव) यांना तर डॉ.संतोष मेहता (डॉ.नीतू मांडके वैद्यकिय सेवा), प्रमोद पाटील (महात्मा बसवेश्वर सामाजिक सेवा), तम्मा शेळके (स्वामी विवेकानंद समाजसेवा पुरस्कार), शोभा खेडगी (राष्ट्रमाता जिजाऊ आदर्श महिला), डॉ.अशोक राठोड (डॉ. द्वारकनाथ कोटणीस कोरोना योद्धा), सुनील बिराजदार (निसर्ग सेवा फाउंडेशन संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता सेवा पुरस्कार) या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.तरी या कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन प्रतिष्ठानचे आधारस्तंभ प्रमोद मोरे यांनी केले आहे.



### निसर्गोपचार तज्ञ स्वागत तोडकर यांचे व्याख्यान

येत्या ९ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता हसत खेळत घरगुती उपचारांवर निसर्ग उपचार मोफत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.याला राष्ट्रीय पुरस्कार विजेते निसर्गोपचार तज्ञ प्रसिद्ध व्याख्याते स्वागत तोडकर हे उपस्थित राहणार असून या व्याख्यान कार्यक्रमातून देखील विविध आजारांवर निसर्गपचार पद्धती शिकायला मिळणार आहे.

अकलूज नगरपरिषद कार्यालय
जा.क्र.०१/ अनप/बांधकाम
दि.०६/०४/२०२३

**अकलूज नगरपरिषद, अकलूज**
प्रधानमंत्री आवास योजना
जाहीर प्रसिद्धीकरण
सन २०२३-२४

याद्वारे शहरातील नागरिकांना कळविण्यात येते की, अकलूज नगरपरिषद अकलूज हद्दीत प्रधानमंत्री आवास योजना सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे तरी लाभार्थ्यांनी अकलूज नगरपरिषद कार्यालयाकडे २१/०४/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज दाखल करण्यात यावेत.

**अटी-**
१) सदर प्रसिद्धीकरण हे BLCC या घटका अंतर्गत देण्यात येत आहे.
२) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) नागरी रहिवासी ज्यांचे स्वतःच्या मालकीचे जमीन आहे. अशा जमिनीवर प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळू शकेल.

**पात्रता अटी व शर्ती-**
१) स्वमालकीची किमान ३० चौ.मी. इतकी जागा असणे आवश्यक आहे.
२) लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न ३ लक्ष पर्यंत मर्यादित असणे आवश्यक आहे.
३) लाभार्थ्यांचे भारतात अन्य कोठेही स्वमालकीचे पक्के घर असता कामा नये.

**आवश्यक कागदपत्रे**
विहित नमुन्यात अर्ज, आयडेंटी साईज फोटो, रेशन कार्ड झेरॉक्स
मतदान कार्ड झेरॉक्स, आधार कार्ड झेरॉक्स
(रेशनकार्ड मधील नावे असलेल्या सर्व व्यक्तींचे असल्यास), पॅन कार्ड झेरॉक्स, ७/१२ उतारा, नं.नं.४३ चा उतारा, सिटीसर्वे उतारा, जागेची खरेदी खताची झेरॉक्स/फेरफार, लाभार्थ्यांचा सध्याचा घरासोबतचा फोटो, तहसिलदार यांचा ३ लक्ष आतील उत्पन्न दाखला.

**खालील गोष्टींची पुर्तता करणारे लाभार्थ्यांचे मराठी मध्ये प्रतिज्ञापत्र व हमीपत्र**
- शासनाद्वारे निर्धारीत आर्थिक अटी स्विकारतो.
- आवश्यक आर्थिक योगदान देण्यास तयार आहे.
- देशात कोठेही पक्के घर नाही.
- चालू वार्षिक कर भरलेली पावती.
- राष्ट्रीयकृत बँक पासबुक झेरॉक्स.

सही/-
**मुख्याधिकारी**
**अकलूज नगरपरिषद, अकलूज**

# महापालिका आयुक्तांनी काढले कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे आदेश

## ६ वरिष्ठ मुख्य लेखनिक झाले कार्यालय अधीक्षक

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर महापालिकेतील १३६ कर्मचारी व अधिकाऱ्यांना खाते अंतर्गत पदोन्नतीचा निर्णय घेण्यात आल्यानंतर आज गुरुवारी महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी पदोन्नतीचे कार्यालयीन आदेश काढले आहेत.

यामुळे ६ वरिष्ठ मुख्य लेखनिक यांची कार्यालय अधीक्षक पदी पदोन्नती झाली तर २९ वरिष्ठ श्रेणी लिपिक हे वरिष्ठ मुख्य लेखनिक झाले आहेत. ४७ कनिष्ठ श्रेणी लिपिकांची वरिष्ठ श्रेणी लिपिक पदी पदोन्नती करण्यात आली आहे. यामुळे महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. काही कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या बदल्याही करण्यात आल्या आहेत.

अवेक्षक ते कार्यकारी अभियंता आणि कनिष्ठ श्रेणी लिपिक ते कार्यालय अधीक्षक पर्यंतच्या एकूण १३६ कर्मचाऱ्यांना खाते अंतर्गत पदोन्नती देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी घेतला. सोलापूर महापालिकेतील बिंदू नामावली (रोस्टर) आजतागायत करण्यात आले नव्हते. ते रोस्टर महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या कारकिर्दीत अखेर तपासून घेण्यात आले.

त्यानंतर आता अनेक वर्षापासून पदोन्नतीचा प्रलंबित असलेला निर्णय अखेर महापालिका आयुक्तांनी घेतला आहे. दरम्यान आज गुरुवारी पदोन्नतीचे कार्यालयीन आदेश महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी काढले आहेत. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. पदोन्नतीमुळे कर्मचारी एकमेकांचे अभिनंदन करत असल्याचे दिसून आले. या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदोन्नतीच्या पदावर आदेश मिळाल्याच्या दिनांक पासून तीन दिवसांच्या आत रुजू करून संबंधित खाद्य प्रमुखांनी विना विलंब कार्यमुक्त करावे. सेवकांनी त्यांच्याकडील असलेल्या पदाचा कार्यभार संबंधित कार्यालयाचे प्रमुख यांच्याकडे हस्तांतर करावा असे या आदेशात नमूद केले आहे.

**६ जणांची कार्यालय अधीक्षकपदी पदोन्नती**

सहा वरिष्ठ मुख्य लेखनिक यांची कार्यालय अधीक्षकपदी पदोन्नती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागातील लक्ष्मीनारायण दोंतुल यांची याच सामान्य प्रशासन कार्यालयात कार्यालय अधीक्षक पदी पदोन्नती करण्यात आली आहे. मंडई विभागातील जगन्नाथ बनसोडे यांचीही याच विभागात मुख्य अधीक्षक पदी पदोन्नती केली आहे. इतर कर्मचाऱ्यांचे नाव व पदोन्नती नंतरचे कार्यालय व पदनाम असे - विभागीय कार्यालय क्रमांक १ येथील उज्वला डांगे ( विभागीय कार्यालय क्रमांक ४ - कार्यालय अधीक्षक), नगरसचिव कार्यालयातील जगन्नाथ माढेकर (सार्वजनिक आरोग्य अभियंता - कार्यालय अधीक्षक), विभागीय कार्यालय क्रमांक ४ येथील ओमप्रकाश वाघमारे (नगरसचिव कार्यालय - सहाय्यक नगरसचिव), घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील सुरेश खसगे (मालमत्ता कर - कर अधीक्षक) आदी.

**चौकट २९ वश्रेली झाले वरिष्ठ मुख्य लेखनिक**

वरिष्ठ श्रेणी लिपिक यांची वरिष्ठ मुख्य लेखनिक या पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांचे नाव आणि पदोन्नती नंतरचे कार्यालय असे – मालमत्ता कार्यालयातील जयवंत फुटाणे ( मालमत्ता कर कार्यालय), प्रशांत जाधव (भूमी व मालमत्ता विभाग), मल्लिनाथ तोडकर (घनकचरा व्यवस्थापन विभाग), अमर कादे (अंतर्गत लेखा परीक्षक), शलमोन रावडे (मालमत्ता कर विभाग), विलास कुलकर्णी (मुख्य लेखापाल कार्यालय – सहाय्यक लेखापाल), रवींद्र कंदलगी (विभागीय कार्यालय क्रमांक चार), नागनाथ कोकणे (मालमत्ता कर कार्यालय), नितीन परदेशी (मालमत्ता कर विभाग), चन्नप्पा म्हेत्रे ( मालमत्ता कर विभाग), जयंत क्षीरसागर (मुख्य लेखा परीक्षक कार्यालय), सुजात वाळके (विभागीय कार्यालय क्रमांक १ ) , राजकुमार कांबळे (घनकचरा व्यवस्थापन विभाग), सुनील वाडिया( विभागीय कार्यालय क्रमांक सहा), पुष्पांजली देसाई (विभागीय कार्यालय क्रमांक आठ), अमोल पवार (मालमत्ता कर विभाग), लक्ष्मण सुरवसे (अंतर्गत लेखा परीक्षक कार्यालय), महादेव काटगावकर (विभागीय कार्यालय क्रमांक तीन), राजू शिवशिंपी (नगर अभियंता कार्यालय), प्रणिता लोखंडे (विभागीय कार्यालय क्रमांक सात), जालिंदर पकाले (सामान्य प्रशासन विभाग), सिद्राम गुडदोर (निवडणूक कार्यालय), देविदास इंगोले (अभिलेखापाल कार्यालय) , राजकुमार सोनसळे (विभागीय कार्यालय ५), सूर्यकांत पांढरे (सामान्य प्रशासन विभाग), प्रदीप जोशी (हुतात्मा स्मृती मंदिर व्यवस्थापक), चंद्रकांत दोंतुल (विभागीय कार्यालय २), संजय जगताप (मालमत्ता कर विभाग) आदी.



### मळोली येथे भारतीय जनता पक्षाचा वर्धापन दिन साजरा

**वेळापूर** : भारतीय जनता पक्षाचा ४४ वा वर्धापनदिन माळशिरस तालुका भारतीय जनता पार्टी यांच्या वतीने मळोली येथे मोठ्या उत्साहात पार पडला.यावेळी भारतीय जनता पक्षाच्या झेंड्याचे ध्वजारोहण अभिमन्यू गुजर यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी दुर्गामाता, अटलबिहारी वाजपेयी, पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पुजन ईश्वर शिंदे ,चंद्रकांत जाधव माजी उपसरंपच,मळोली व भारतीय जनता पार्टी माळशिरस तालुका उपाध्यक्ष , शिवाजीराव जाधव (समन्वयक सोलापूर जिल्हा विश्वहिंदु परिषद) अँड.राजेंद्र पवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी पक्षाच्या सर्वांगीण विकासावर गुजर यांनी विचार व्यक्त केले. भारतीय जनता पार्टीच्या वर्धापनदिनानिमित्त गावातील जेष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवशंकर वि.का.स. सोसायटीचे चेअरमन शशांक जाधव, व सर्व संचालक मंडळ तसेच माजी चेअरमन महादेव शिवाजी जाधव, अरुण पवार ,पांडुरंग जाधव, भिमराव मोरे तसेच जयराम जाधव, अंकुश देवकाते,आगतराव मदणे, नवनाथ जाधव, सौरभ जाधव, शंकर जाधव व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिवाजीराव जाधव यांनी केले.



### सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजातर्फे नेत्र शिबीर

**सोलापूर** : सोमवंशी आर्य क्षत्रिय समाज, सोलापूर च्या समाज बंधु-भगिनी करिता श्री मुक्तेश्वर मंदिर ट्रस्ट, सोलापूर कडून दि. २३ मार्च ते २८मार्च या कालावधी मध्ये नेत्र तपासणी व उपचार ह्या नेत्र शिबिराचे आयोजन केले आहे. ही शिबिर डॉ. आडके यांच्या हॉस्पिटल मध्ये घेण्यात आले. ह्या शिबिरात एकूण १३७ नेत्र तपासणी झाल्या २१ शस्त्रक्रिया करण्यात आले आहे, १०१ जणांना चष्मे देण्यात आले व अनेक जणांवर औषधोपचार केले गेले. श्री मुक्तेश्वर मंदिर ट्रस्ट - डॉक्टर आडके यांचे आभारी आहे. हे शिबीर यशस्वी करण्यात समाज युवक मंडळांनी परिश्रम घेतले. श्री मुक्तेश्वर मंदिर ट्रस्ट, सोलापूर कडून नेत्र शिबीर संपन्न झाले.




### जागतिक आरोग्य दिनानिमित्त तीन डॉक्टर्सची भाषणे

**सोलापूर** : इंडियन रेडक्रॉस सोसायटी, शाखा सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा व श्रीमती गोपाबाई दमाणी ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य दिनानिमित्त स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांसाठी शुक्रवार दि. ०७ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता प्रसिध्द मेंदूविकारतज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर, ख्यातनाम कर्करोगतज्ञ व शल्यचिकित्सक डॉ. शिरीष कुमठेकर व सोसायटीचे चेअरमन प्रसिध्द पॅथॉलॉजिस्ट डॉ. राजीव प्रधान यांची व्याख्याने श्रीमती गोपाबाई दमाणी ब्लड सेंटरच्या हॉलमध्ये आयोजित करण्यात आली आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे भूषविणार आहेत अशी माहिती इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे सचिव जयेशभाई पटेल व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्राचार्य एम. जमादार यांनी दिली.



### भारतीय जनता पार्टी स्थापना दिना निमित्त कमळ पूजन

**सोलापूर** : विडी घरकुल सागर चौक गुरुवार दि. ६ रोजी सकाळी ११ वाजता कमळ पूजन आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते पूजन करून आरती करण्यात आल्या. यावेळी पुष्प वृष्टी करण्यात आल्या तसेच भारतीय जनता पार्टीचा विजय असो, भारत माता की जय, वंदे मातरम , नरेंद्रजी मोदी तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है असे घोषणा देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे आयोजन विजय इप्पाकायल यांनी केले यावेळी विडी घरकुल भागातील ज्येष्ठ नागरिक सुभाष गोंदकर, दत्तात्रय कोंतम, कृष्णहरी दुडका, ईरय्या स्वामी, अंकुश मजुळकर भा.ज.पा.चिटणीस रुचिता मासन, राजु हिबारे, सतीश सिरसुल्ला, शेखर राचर्ला, संजय वाघमारे उपस्थित होते यावेळी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रमेश सुंचु, राजू पानगंटी, नरेश गोरे, निखिल बेत, कल्पेश गंधमल, आबा शिंदे, राजेंद्र मासन, अनिल वाघमारे ,आणा गायकवाड, दीपक शिंदे, राम मलजी, विनायक दामजी, प्रेम वाघमारे ,अमित आंलकाटे ,सुनिल वाघमारे आनंद मड्डी, परिश्रम घेतले यावेळी बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

## लोटेवाडी ग्रामस्थ पाण्यासाठी टाकीवर चढून करणार आंदोलन

**सुराज्य/सांगोला**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग सांगोला यांच्या अंतर्गत शिरभावी पाणीपुरवठा योजना ही चालू आहे परंतु केले एक महिन्यापासून लोटेवाडी ग्रामपंचायतने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग सांगोला यांना पत्ता देऊन सुध्दा अध्यापित पाणीपुरवठा केलेला नाही.

या संदर्भात त्यांना वारंवार तोंडी फोनवरून ऑफिसला भेटून मागणी केली असता लिकेज असल्याचं कारण देत अध्यापित पाणीपुरवठा केला नाही.

त्यामुळे जनतेच्या अतोनात हाल होत आहेत अशा परिस्थितीत ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना सांगोला उप विभाग यांना लेखी निवेदनाद्वारे निवेदन देऊन जर पाणी ८एप्रिल पर्यंत न सोडल्यास शिरभावी पाणीपुरवठा टाकी वरती चढून सर्व ग्रामस्थ व ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य आंदोलनाचा इशारा दिला आहे

## कृषी विभागाच्या विविध योजनांतून तालुक्यातील पावणेदोन हजार शेतकऱ्यांना लाभ

### जवळपास साडे सहा कोटी रुपयांचे अनुदान वितरित

**सुराज्य/पंढरपूर**

शेतकरी बांधवांना शेतीसाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींच्या खरेदीसाठी तसेच शेतामध्ये विविध पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी आर्थिक मदत मिळावी, यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या कृषी विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत.

पंढरपूर तालुक्यात कृषी विभागाच्या विविध योजनांच्या माध्यमातून १ हजार, ८९६ शेतकऱ्यांना ६ कोटी, ४६ लाख, १२ हजार, ३०४ रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांनी दिली.

भागवत सरडे म्हणाले, शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच या योजना पारदर्शक व गतिमान पद्धतीने राबविण्यासाठी महाडीबीटी प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्र शिकण्यापासून ते अनुदानावर शेतीसाठी आवश्यक उपकरणे



खरेदी करता येत आहेत. कृषी विभागाच्या माध्यमातून प्रामुख्याने बियाणे, यंत्र व अवजारे, ठिबक तुषार संच इत्यादींची खरेदी तसेच शेततळे, खोदकाम, प्लास्टिक अस्तरीकरण, कांदा चाळ, शेडनेट गृह व हरितगृह उभारणी, फळबाग लागवड नियोजन, कृषी यांत्रिकीकरण आदी योजनांचा समावेश असल्याचे श्री. सरडे यांनी सांगितले. पंढरपूर तालुक्यात कृषी विभागामार्फत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात कृषी यांत्रिकीकरण, ठिबक सिंचन, वैयक्तिक शेततळे, शेततळे अस्तरीकरण, कांदाचाळ अशा विविध योजनांतून १ हजार ८९६ शेतकऱ्यांना ६ कोटी ४६ लाख १२ हजार ३०४ रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले असून, शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही सरडे यांनी केले आहे.

## अनुसूचित जाती विभागाच्या अध्यक्षपदी रणजित महापूर

**सांगोला** : सांगोला तालुका अनुसूचित जाती विभागाच्या अध्यक्षपदी महिम गावचे रहिवाशी रणजित दुर्योधन महापुरे यांची निवड करण्यात आली रणजित महापुरे यांची अध्यक्षपदी निवड झाले बद्दल त्यांचा सत्कार सांगोला तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आला. पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी ज्येष्ठ नेते प्राध्यापक पी सी झपके काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष हरिभाऊ पाटील सांगोला तालुका अध्यक्ष सुनील भोरे रवी साबळे अनिल बेहरे फिरोज मनेरी उपस्थित होते.

## म.फुले आणि डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त शिष्यवृत्ती परीक्षा

**सुराज्य/सोलापूर**

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त सम्यक ॲकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सम्यक प्रज्ञा शोध परीक्षा - २०२३ या शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केले असल्याची माहिती बुद्धजय भालशंकर यांनी दिली आहे.

ही शिष्यवृत्ती परीक्षा रविवार दिनांक १६ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ठीक १०.३० ते ११.३०.या वेळेत सोलापूर, मोहोळ, पंढरपूर या ठिकाणी संपन्न होणार आहे.परीक्षा ही लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असून परीक्षेचा विषय - ,फुले-शाहू-आंबेडकर यांचे सामाजिक कार्य, भारतीय संविधान- निर्मिती त्यातील महत्त्वाच्या तरतुदी आणि संस्था असा आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना एकूण रुपये १५०००/- ची शिष्यवृत्ती,सन्मानचिन्ह आणि ग्रंथ भेट देण्यात येणार आहे. परीक्षेसाठी पात्रता इयत्ता १२ वी उत्तीर्ण असणे गरजेचे आहे. सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

नावनोंदणी आणि अधिक माहिती साठी -बुद्धजय भालशंकर मो.९९६०३७२७३६, आशुतोष तोंडसे मो.७०३८८८३३३९,प्रा. पी. एस.शिंदे (मोहोळ) मो.८६९८९०२५०२,महादेव कांबळे (पंढरपूर) मो. ७०८३९९६१०२ ,राहुल साखरे मो.९६६५१६५२५० यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन संयोजन समितीने केले आहे.

## बेकायदेशीर गुटखा विक्री करणाऱ्या सहा जणांवर कारवाई

**सुराज्य/अकलूज**

अकलूज पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात बेकायदेशीर पणे विमल पानमसाला, सुगंधी तंबाखू,आर.एम. डी. पानमसाला, सुकामावा, राजू सुपारी, रजनीगंधा पानमसाला, मिराज सुगंधित तंबाखू व इतर तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या अकलूज व यशवंत नगर येथील सहा पानटपरी चालकांवर अन्न व औषध प्रशासन व अकलूज पोलिसांच्या वतीने कारवाई करण्यात आली.

याबाबत अकलूज पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक,हिंमत जाधव,उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज डॉ. बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड अकलूज पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक ०६/०४/२०२३ रोजी ११.०० ते १३.३० वा. या कालावधीत पोलीस अंमलदार शिवकुमार मदभावी, समीर पठाण, विशाल घाटगे, सिद्धनाथ कंटोळी यांचे पथकाने आरोपी १) सतीश अशोक भोंगळे रा. राहुल पानशॉप यशवंतनगर, २) महेश भारत भोंगळे रा. मे. भारत पानशॉप यशवंतनगर, ३) दशरथ पांडुरंग नाळे रा. रणधैर्य पानशॉप यशवंतनगर, ४) लालासाब मकबुल शेख रा. लाला पानशॉप, सदुभाऊचौक अकलूज, ५) महामुद शब्बीर शेख रा. पुष्पक पानशॉप श्रीराम टॉकिज समोर अकलूज, ६) विलास जगन्नाथ दोरकर रा. महर्षी पानशॉप, प्रतापसिंहचौक अकलूज ता. माळशिरस हे चालवत असलेले पानशॉपचे दुकानामध्ये विमल पानमसाला, सुगंधी तंबाखू, आर. एम. डी. पानमसाला, सुकामावा, राजू सुपारी, रजनीगंधा पानमसाला, मिराज सुगंधित तंबाखू व इतर तंबाखूजन्य पदार्थ असे ३३,५९०/- रुपयाचा व तो मानवाचे जीवितास धोका निर्माण होणारा प्रतिबंधित गुटखा माल स्वतःचे आर्थिक फायदयासाठी विक्री करण्यासाठी मिळून आले आहेत. सदर आरोपीविरुद्ध प्रज्ञा प्रमोद सुरसे, सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, सोलापूर यांनी दिलेले फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक सुनील जाधव हे करीत आहेत.

## बृहन्महाराष्ट्र क्रेडिट कामगार सोसायटीच्या चेअरमनपदी पाटील

**सुराज्य/श्रीपूर**



श्रीपूर तालुका माळशिरस येथील दि बृहन्महाराष्ट्र एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटीच्या झालेल्या पंचवार्षिक निवडणूक झाली होती. विजय पाटील यांच्या जगदंबा पॅनलने सर्व जागा जिंकून वर्चस्व कायम ठेवले होते .

आज रोजी झालेल्या चेअरमन व व्हा. चेअरमन निवडणुकीत चेअरमनपदी विजय पाटील व व्हा चेअरमनपदी पांडुरंग गोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीबद्दल निवडणूक अधिकारी जी बी जाधव, एम एल शिंदे, झरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी माजी चेअरमन जयकुमार घाडगे व माजी चेअरमन भालचंद्र शिंदे यांनी संस्थेच्या नवीन संचालकांना मार्गदर्शन करून संस्थेच्या कामकाजाबाबत च्या सूचना देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना विजय पाटील म्हणाले की कामगार सोसायटीचे कामकाज करताना सर्वांना बरोबर घेऊन कामगार हित व कामगारांना लवकरात लवकर कर्ज उपलब्ध करून देणे त्याचबरोबर कामगारांना सर्व प्रकारचे सहकार्य केले जाईल असे विजय पाटील यांनी सांगितले.

निवडलेले संचालक, सुभाष ज्ञानोबा पवार ,नवनाथ सदाशिव मलपे , रघुनाथ बळीराम देठे विश्वनाथ अनंत कुलकर्णी कुमार नामदेव शिंदे , रामचंद्र गोरख गोफणे , संजय विश्वनाथ यादव , सुनिता सर्जेराव जाधव , कविता विजय गुरव, मुख्याध्यापिका सुरेखा जाधव, बाळासाहेब खुळे, भारत रंधवे, संस्था कर्मचारी सेक्रेटरी दादा म्हसवडे, महादेव चौगुले,दादा थिटे आदी. उपस्थित होते.

## पाथरी गावच्या तलावातील ५१ शेतकऱ्यांच्या पाणबुडीची कॉपर वायरची चोरी

**सुराज्य/बार्शी**

बार्शी तालुक्यातील पाथरी या तलावातील पाणी शेतातील पिकास घेण्यासाठी बसविण्यात आलेले पाणबुडी मोटारीला जोडलेल्या विजेच्या कॉपर वायरी अज्ञात आरोपीनी पाच गावातील ५१ शेतकऱ्याच्या चोरून नेल्याची घटना घडली .

विद्युत पपास जोडलेल्या ५१ शेतकऱ्याच्या सुमारे ५० हजार रुपयाच्या कॉपर केबल चोरून नेल्याची घटना ३ रोजी रात्रीच्यावेळी पाथरी,घारी,पांगरी,पुरी, शिराळे या गावच्या शेतकऱ्यांची घडली .

याबाबत शेतकरी सागर दिलीप गायकवाड ३५ रा.पाथरी ता.बार्शी यांनी तालुका पोलिसात विद्युत पंपाच्या पेटीपासून विद्युत पंपापर्यंतची ५० हजार रुपये किंमतीची ९ हजार १०५ फूट कॉपर वायर चोरून नेल्याची तक्रार दुसऱ्या दिवशी तालुका पोलिसात देताच अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अज्ञात चोरट्याने पंपाच्या विजेच्या कॉपर वायर चोरून नेल्याची घटना ३ रोजी फिर्यादी शेतात विद्युत मोटर चालू करण्यास सकाळी आठ वाजेच्या सुमारास गेल्यानंतर ही घटना उघडकीस आल्याने व इतर शेतकऱ्यांनीही त्याच्या मोटारीच्या वायर चोरून नेल्याचे लक्षात आल्याने ही तक्रार शेतकऱ्याच्या वतीने दाखल केली आहे .

याबाबत दिलेल्या तक्रारीत फिर्यादी हा रविवारी २ एप्रिल रोजी मोटार चालू करण्यास गेले असता दिवसा व रात्री वीजप्रवाह पूर्ण बंद झाल्याने परत गेले होते .त्यानंतर ते ३ रोजी चालू करावयास गेले असता विजेच्या बॉक्स पासून ते पाणबुडी मोटर पर्यंत तपासणी करताना वायरच नसल्याचे दिसले . विद्युत पुरवठा बंद असल्याची संधी साधत अज्ञात चोरट्याने फिर्यादी सागर गायकवाड यांची १६० फूट,श्रीकृष्ण गायकवाड यांची ३%५ फूट,चंद्रकांत गायकवाड १५० फूट,दयानंद पाटील १%५ फूट,मोहन गायकवाड १५० फूट,धनवंत पाटील २०० फूट,गौतम गायकवाड २०० फूट,राजेश गायकवाड १५० फूट,अच्युत गायकवाड १५० फूट,विकास गायकवाड २०० फूट,बापू पकाले १५० फूट,कमलाकर गायकवाड २०० फूट,सुहास खळदकर २०० फूट, हनुमंत गायकवाड १%५ फूट, शंकर गायकवाड १%५ फूट, विनोद गायकवाड २०० फूट, गोरख कांबळे २०० फूट, गुणवंत गायकवाड २०० फूट, आगतराव जगदाळे २०० फूट, प्रदीप गायकवाड १५० फूट, नानासाहेब गायकवाड १६० फूट, संतोष गायकवाड २०० फूट, सुभाष गायकवाड १५० फूट, ब्रम्हचारी गायकवाड २०० फूट, प्रदुम्न गायकवाड १५० फूट, श्रीराम पाटील १६०, मोहन पाटील १५० फूट, नागेश गायकवाड १५०फूट, सर्जेराव गायकवाड ३०० फूट, अरुण गायकवाड १५० फूट, प्रभाकर गायकवाड १५० फूट, अरुण बाबूराव गायकवाड १५० फूट, बिभीषण गायकवाड १५० फूट, बजरंग पाटील १४० फूट, वच्छिष्ट खळदकर १३० फूट, मोहन ज्ञानदेव गायकवाड १५० फूट, कुंडलिक गायकवाड, मिठू गायकवाड १४० फूट सर्व रा.सर्व पाथरी, सुनील जगदाळे २०० फूट, तानाजी बसाटे १५० फूट, गौरीशंकर घोंगडे १४० फूट, महालिंग घोंगडे १५० फूट, आत्माराम लोखंडे १४० फूट, अण्णा लोखंडे १२० फूट, अजिनाथ भंडारे १५० फूट रा.सर्व घारी,सुभाष डिडवळ १३० फूट, दीपक झालटे १२० फूट, दत्तात्रय झालटे १३० फूट सर्व रा.पुरी, बापू खबाले १३० फूट रा.पांगरी श्रीहरी गायकवाड १५० फूट रा.शिराळे या शेतकऱ्याची ४३ हजार २७५ रुपयांची जवळपास ९ हजार १०५ फूट कॉपर वायर चोरून नेली आहे.

# गुन्हे प्रकटीकरणांमध्ये मंद्रूप पोलीस ठाणे सरस

सुराज्य/दक्षिण सोलापूर

**मंद्रूप पोलीस ठाण्या अंतर्गत वेगवेगळ्या उपक्रमांबरोबरच गुणवत्ता, शिस्त, गुन्हे शाबितीचे प्रमाण आणि गुन्हे प्रकटीकरणांमध्ये देखील मंद्रूप पोलीस ठाणे सरस ठरत आहे.**




मंद्रूप पोलीस ठाणे अंतर्गत वेगवेगळ्या उपक्रमांबरोबरच गुणवत्ता, शिस्त, गुन्हे शाबितीचे प्रमाण आणि गुन्हे प्रकटीकरणांमध्ये देखील मंद्रूप पोलीस ठाणे सरस ठरत आहे.

२६ नोव्हेंबर २०२३ पासून ३१ मार्च २०२३ पर्यंत मंद्रूप पोलीस निरीक्षक ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांच्या नेतृत्वाखाली मंद्रूप पोलीस ठाण्याच्या यशात आणखीन एक मानाचा तुरा रोवला आहे. आता चार महिन्यांमध्ये १९ लाख ३२ हजार ६३५ रुपयांचा माल मिळाला असून आतापर्यंत ४७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अशा वेगवेगळ्या माध्यमातून मंद्रूप पोलीस ठाणे आगळ्यावेगळ्या रूपाने ठरत आहे. मालाविषयी अज्ञात आरोपीविरूध्द चोरीचे गुन्हे दाखल करून दोन गुन्हे उघडकीस आणून दहा आरोपींना अटक करून यामध्ये वाहनासह ९ लाख ४४ हजार१८० रूपयांचा माल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच अवैध वाळू वाहतुकीत अंतर्गत दोन गुन्हे दाखल करण्यात असून दोनजणांवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये सहा लाख ६५ हजार रुपयांचा मला जप्त करण्यात आला आहे. यातील आरोपींना ताब्यात घेऊन आरोपीचे नाव निष्पन्न करण्यात मंद्रूप पोलीस ठाण्यांला यश आले आहे. अवैध दारूबंदी अंतर्गत आतापर्यंत १५ गुन्हे दाखल करण्यात आली असून १५ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये एक लाख ४४ हजार ५ रूपये किमतीचा माला करण्यात आला आहे. तसेच अवैध जुगार अंतर्गत ४ गुन्हे दाखला करण्यात आली असून ११ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये जुगार रकमेसह साहित्य असे एक लाख ३० हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातून मंद्रूप पोलीस ठाण्याने तीन आरोपींचा शोध घेऊन तपास करण्यात आले आहे. त्यातील दोन आरोपीचा मृत्यू झाला. या दोयांचे मृत्यू झाल्याने त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र हस्तगत करून नाव कमी करण्यात आले आहे. तसेच पाहिजेत असलेल्या दोन आरोपींना न्यायालयात हजर झाल्याने न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांचे नाव कमी करण्यात आले आहे. सीआरपीसीअंतर्गत दोन आरोपींवर कारवाई करून ४८ हजार ७१० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. अशा वेगवेगळ्या माध्यमातून ही कारवाई करण्यात मंद्रूप ठाणे सरस ठरत आहे.

आतापर्यंत वेगवेगळे उपक्रम राबविण्याबरोबरच अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. गेल्या चार महिन्यांत मंद्रुप पोलीस स्टेशन येथे ५४ दारूबंदीचे गुन्हे दाखल करून ५४ आरोपींवर कारवाई केली आहे. २४ जुगार चे गुन्हे दाखल करून ३८ आरोपींवर कारवाई केली असून खुंखार अश्या ९ आरोपींवर तडीपारीचे प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत. गुन्हे शाबिती मध्ये मंद्रुप पोलीस स्टेशन जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर असून प्रामाणिकपणे सेवा बजवताना हे सर्व यश मिळविणे शक्य झाले आहे. मंद्रुप पोलीस स्टेशन चे अधिकारी व सहकारी अंमलदार यांचे सहकार्य लाभत आहे. शिरीष सरदेशपांडे सो. पोलीस अधीक्षक सोलापुर ग्रामीण, हिम्मत जाधव सो. अप्पर पोलीस अधीक्षक सोलापुर ग्रामीण, अमोल भारती सो. उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आपण वाटचाल करत आहोत.

**- रवींद्र मांजरे**
सहायक पोलीस निरीक्षक, मंद्रूप पोलीस ठाणे

**मागील ४ महिन्यात अशी आहे गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी**

▸ चोरी : २ गुन्हे १० जण अटक ▸ अवैध वाळू कारवाई : २ गुन्हे २ अटक ▸ दारूबंदी : १५ गुन्हे १५ अटक ▸ जुगार : ४ गुन्हे ११ जण अटक ▸ सीआरपीसी १२२ : १ गुन्हा २ जण अटकेत ▸ पाहिजेत आरोपी : ५ गुन्हे ७ जण अटकेत ▸ एकूण रक्कम हस्तगत : १९,३२,६३५ ▸ अटक आरोपी : ४७

## कै.उदयसिंह मोहिते-पाटलांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

सुराज्य/अकलूज



महाराष्ट्र राज्य कुक्कुटपालन संघाचे माजी अध्यक्ष उद्योग महर्षि कै.उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या सातव्या पुण्यतिथी निमित्त श्री क्षेत्र आनंदी गणेश येथील त्यांच्या शक्तिस्थलावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, शिवशंकर बझारच्या चेअरमन डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील, माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, प्रताप क्रिडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील, माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील, देवन्या मोहिते-पाटील, ॲड. नितीन खराडे, दत्तात्रय भिलारे, अनिल जाधव, महाळुंग-श्रीपूरचे उपनगराध्यक्ष भीमराव रेडे, नगरसेवक सोमनाथ मुंडफणे, तानाजी भगत, शिवशंकर बझारचे व्हा.चेअरमन मदन भगत, व्यवस्थापक गोपाळराव माने-देशमुख, शिवरत्न कन्स्ट्रक्शनचे नरसिंह करडे, दिग्वीजय खराडे, अनिल उघडे, राहुल बोबडे, कुलदीप पाटील, प्रकाश गायकवाड, मनोज क्षीरसागर, नागेश बनकर, प्रितम एकतपुरे, सारंग कन्हेरे, राहुल नागणे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

याशिवाय शिक्षण प्रसारक मंडळ, शिवरत्न शिक्षण संस्था, शिवशंकर बझार, शिवरत्न कन्स्ट्रक्शन व विविध संस्थांमध्ये प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.




## आदर्श क्रीडा पुरस्कार अनिल जाधव यांना प्रदान

सुराज्य/अकलूज

महाराष्ट्र फाउंडेशन सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर येथील सहशिक्षक अनिल प्रभाकर जाधव यांना पोलीस आयुक्त दिपक आर्वे यांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श क्रीडा प्रशिक्षक पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, सुभेदार मेजर ठाकूर, कर्नल जाधव , आमची माती आमची माणसे चे अँकर अक्षय बनकर, बालरोग तज्ञ डॉ.नितीन एकतपुरे अकलूज, अध्यक्ष रणजित लोहार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र फाउंडेशन सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या ८ व्या वर्धापन दिनानिमित्त लोकमान्य टिळक सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात अनिल जाधव यांना राज्यस्तरीय आदर्श क्रीडा प्रशिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अनिल जाधव हे १९८८ पासून कै. उदयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण प्रसारक मंडळ येथे क्रीडा प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या आतापर्यंत च्या कार्यकाळात १५ पेक्षा अधिक राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू तयार केले आहेत.

याशिवाय शेकडो विध्यार्थी विद्यार्थिनींना जिल्हास्तरीय, विभागीय स्तरावर यश मिळवण्यात मार्गदर्शन केले आहे. शिवाय ते सोलापूर जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे संचालक व जिल्हा क्रिकेट निवड समितीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांना मिळलेल्या पुरस्कारा बद्द्ल माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, स.म.कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील, आ.रणजितसिंह मोहिते पाटील, शिवामृत चे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, अकलूज चे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी तात्काळ सेतू सेवा सुरू करा : वाघमारे

### बहुजन मुक्ती पार्टी सोलापूर जिल्हा महासचिव

सुराज्य/वेळापूर




जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत सोलापुर जिल्ह्यातील ११ तालुक्यातील शासनाच्या दिशा निर्देशनखाली सुरू केलेले सेतु कार्यालय बंद करण्याचे परिपत्रक जिल्हा प्रशासनाने काढले आहे. व सांगितले आहे की आता तुम्ही सर्व प्रकारचे सेतु मधील काम तुम्ही महा. ई. सेवा केंद्राच्या माध्यमातून करा.परंतु सेतु मध्ये ५० ते ६० रुपायांमध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे होणारे काम महा. ई सेवा.केंद्रामध्ये २०० ते ३०० रुपयांमध्ये होणार आहे.

त्याचप्रमाणे लोकांची व विद्यार्थी यांची प्रचंड मोठ्या प्रमाणात आर्थिक लुट होणार आहे, लोकांना व विद्यार्थ्यांना वेळेत दाखले मिळणार नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे.

त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यांनी शैक्षणिक नुकसान झाल्यामुळे त्याच्या जीवाचे काही बरे वाईट केले तर त्यास सर्वस्वी जबाबदार कोण? त्याचप्रमाणे महा. ई सेवा.केंद्राच्य माध्यमातून मागील काळात एका वृध्द महिलेचे खोटे अफेडयुएट करून तिचे २ कोटी रुपये लंपास केले होते. यामध्ये उत्तर तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार राऊत गोळे यांना काही दिवस जेल मध्ये राहावे लागले होते. त्यामुळे महा. ई. सेवा केंद्रांमुळे खुप मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळे झालेले पाठीमागील काळातील अनुभव आहेत. त्यामुळे सेतु कार्यालय बंद केल्यामुळे सेतु मध्ये काम करून उपजीविका करणाऱ्या लोकांवर उपासमारीची तथा बेरोजगारीची वेळ येणार आहे. बेरोजगारी मुळे त्यांनी त्यांच्या जीवाचे काही बरे वाईट केल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? त्यामुळे सेतु बंद करण्यासाठी काढलेले ते परिपत्रक जिल्हा प्रशासनाने विचार करून ते बदलून सोलापुर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील सेतु कार्यालय पूर्ववत सुरू करून लवकरात लवकर रिं टेंडर काढावे. व नागरिकांची व विद्यार्थ्यांची भविष्यात होणारी सर्व प्रकारच्या दाखल्या संदर्भातील गैरसोय थांबवावी.

नाहीतर भविष्यात जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी विद्यार्थी व नागरिक यांना घेऊन मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात येईल या प्रमुख मागणीसाठी सोलापुर जिल्हाधिकारी यांना बहुजन मुक्ती पार्टीचे सोलापुर जिल्हा महासचिव सौरभ वाघमारे यांनी निवेदन दिले. यावेळेस भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष सिध्दार्थ बोराडे राष्ट्रवादीचे युवक अकलूज शहर अध्यक्ष अविनाश सोनवणे उपस्थित होते.

## औद्योगिक क्षेत्रात उत्पादन प्रकल्प उभारणार

सुराज्य/सोलापूर

रायगडमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या इसांबे औद्योगिक क्षेत्रात ल्युब्रिकंट्स उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी जवळपास ९०० कोटी रुपयांची गुंतवणूक करत आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि महाराष्ट्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कंपनीने ही घोषणा केली असल्याचे एक्झॉनमोबिलने सांगितले.

## वेळापूर येथे डॉ. आंबेडकर, फुले जयंतीनिमित्त कार्यक्रम

**वेळापूर** : महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वेळापूर येथील पालखी मैदान येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्यावतिने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



११ एप्रिल २०२३ रोजी सायं.७.३० वाजता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रसिद्ध शिवशाहीर, भीमशाहीर राजेंद्र कांबळे (खुडूसकर) यांचा शाहिरी जलसा कार्यक्रम आयोजित केला आहे. बुधवार दिनांक १२ एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी ०७:३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती व्यंकोजी महाराज यांचे तेरावे वंशज शिवश्री फत्तेसिंह राजे भोसले यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान व लोकशाहीचे भवितव्य या विषयावर जाहीर व्याख्यानाचे अयोजन करण्यात आले आहे. तसेच १३ एप्रिल रोजी सायं.०७:३० वाजता जिल्हास्तरीय ओपन डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

### नीरा पाटबंधारे खात्याचा ऐन उन्हाळ्यात कारभार

## वेळापूर माळखांबी मायनर कॅनॉलला पाणी देण्याबाबत अन्याय

**वेळापूर** : वेळापूर माळखांबी मायनर कॅनलला पाणी देण्याबाबत निरा पाटबंधारे खात्याचा शेतकऱ्यांवर ऐन उन्हाळ्यात अन्याय होत असून वेळापूर डिफोर कालवा व माळखांबी मायनर कालव्याला १८० डे. क्युसेसने सोडण्याची शेतकऱ्यांमधून मागणी होत आहे. नीरा उजवा कालवा पाटबंधारे विभाग फलटण यांच्याकडील उन्हाळा हंगाम २०२२/२३ चे धोरणानुसार वेळापूर माळखांबी मायनर कॅनालवरील फटा नंबर १ ते १७ पर्यंतच्या अनेक शेतकऱ्यांनी रोख स्वरूपात पानपट्टी रक्कम भरणा करून पाणी मागणी केलेली आहे.



निरा उजवा कालव्यास उन्हाळा हंगामासाठी १ मार्चपासून पाणी सोडण्यात आलेले असून वेळापूर माळखांबी मायनर शेजारील खंडाळी ब्रॉंच कॅनॉलला १ मार्चपासून पाणी देऊन २५ मार्चपर्यंत संपूर्ण भरणे पूर्ण केले आहे. नीरा उजवा कालवा वितरिका क्रमांक ४ वरून डी फॉर कॅनॉल व माळखंबी मायनर कॅनलला पाणी सोडण्यात येते. वेळापूर डी फोर कॅनॉलचा टेल उघडेवाडी गावामध्ये आहे तसेच वेळापूर माळखंबी मायनर कॅनलचा टेलही उघडेवाडी गावातच आहे. पाटबंधारे खात्याचे पाणी वाटप धोरण टेल ते हेड असताना वेळापूर डी फोर कॅनाल ला २२ मार्चपासून पाणी सोडण्यात आलेले आहे मात्र माळखांबी मायनर कॅनलला अद्यापही ६ एप्रिल२०२३ पर्यंत पाणी सोडण्यात आलेले नाही. डिफोर कॅनाल वरील डिमांड व मागणी क्षेत्र ज्यादा असेल तरी डिफोर कॅनाल वरची वहन क्षमता १२० डे. क्युसेस आहे व माळखांबी मायनर वरील डिमांड मागणी क्षेत्र कमी असेल तरी माळखांबी मायनर कॅनॉलची वहन क्षमता ६० डे.क्युसेस आहे. निरा उजवा कालवा वितरिका क्रमांक ४ ची वहन क्षमता १८० डे .क्युसेस असताना फक्त १०० डे. क्युसेसने पाणी सोडून प्रत्येक हंगामात प्रत्येक पाळी मध्ये डी फोर कॅनलला प्राधान्याने व वेळेत पाणी सोडले जाते मात्र माळखांबी मायनर कॅनॉलला डी फोर कालव्याला पाणी सोडल्यानंतर तब्बल १५ ते २० दिवसांनी उशिराने व निरा उजवा कालवा मेन कॅनॉल सुटल्यानंतर ४५ ते ५० दिवस उशिराने ऐन उन्हाळयात पिके पाण्यावाचून जळाल्यानंतर पाणी देऊन गेली १० वर्षा पासून शेतकऱ्यांवर अन्याय केला जात आहे इतर कॅनॉलवर मात्र वेळेत पाणी दिल्याने पिकांची परिस्थिती चांगली राहत असून तेथील शेतकऱ्यांचे उत्पन्न चांगले येत आहे. माळखांबी मायनर कॅनॉल वर पाणी देण्याबाबत सतत अन्याय व खर्च करून उभा केलेली पिके जळून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.


### ▸ डि फोर कालव्यावरील बेकादेशीर सायपनी काढा

डी फोर कॅनॉल वर बेकायदेशीर मोठ्या संख्येने सायपन द्वारे चोरून पाणी घेण्याचे राजे रोसपणे सुरू आहे त्याबाबत शेतकऱ्यांनी अनेक वेळा तक्रारी करू नये सदर बेकायदेशीर सायपन संबंधित अधिकाऱ्याच्या आशीर्वादने राजे रोसपणे सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांमधून होत असून या बेकायदेशीर सायपन मुळे डि फोर कालव्याचे भरणे लवकर होत नसल्याने माळखंबी मायनर कॅनलला वेळेत पाणी देण्याबाबत अन्याय केला जात आहे संबंधित अधिकाऱ्यांनी डिफोर कालव्यावरील संपूर्ण बेकायदेशीर सायपणे काढून टाकावीत व त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी शेतकरी वर्गातून मागणी होत असून जर वेळेत साय पनी नाही काढल्यास निरा उजवा कालवा वेळापूर ऑफिस समोर उपोषण करावे लागेल असा इशारा सावता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष महादेव भाऊ ताटे यांनी दिला आहे.



## भाजपचा ४४ वा वर्धापन दिन सांगोल्यात साजरा

**सांगोला** : भारतीय जनता पार्टीचा ४४ वा वर्धापन दिन सांगोला तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने भाजप कार्यालय वाढेगाव नाका, सांगोला येथे मोठ्या उत्साहात प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थित साजरा करण्यात आला. यावेळी पक्षाच्या झेंड्याचे ध्वजारोहण करून भारतमाता,पंडित दीनदयाळ उपाध्याय, शामाप्रसाद मुखर्जी आदींच्या प्रतिमेचे पूजन तालुकाध्यक्ष चेतनसिंह(बाळासाहेब) केदार- सावंत यांचे हस्ते पुष्पहार घालून करण्यात आले. याप्रसंगी नागेश जोशी, वसंतराव सुपेकर , उत्तम चौगुले, कॅप्टन रावसाहेब साळुंखे, मेजर नरेश बाबर आदींचा सत्कार तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार - सावंत, माजी नगराध्यक्ष नवनाथ पवार, आनंद फाटे यांच्या हस्ते करण्यात आला. भाजपचा आज स्थापना दिवस असल्याने गेल्या ४४ वर्षात देशात व राज्यात पक्ष संघटन मजबूत करून देशातील व राज्यातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने कसोशीने प्रयत्न करून बलशाही राष्ट्र साकार करण्यासाठी विशेष प्रयत्न केल्याने भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना धन्यवाद देण्यात आला.यावेळी भाजपच्या वाढीसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांचाही गौरव करून त्यांचे विशेष आभार मानण्यात आले. तसेच भाजपचे विचार ध्येयधोरण सांगोला तालुका सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणार असल्याची ग्वाही यावेळी बोलताना तालुका अध्यक्ष चेतनसिंह केदार - सावंत यांनी दिली.या कार्यक्रमास भाजप किसान प्रदेश कार्यकारणी सदस्य शिवाजीराव गायकवाड,अनिल वाघमोडे,प्रवीण जानकर,संजय गव्हाणे, मानस कमलापुरकर, लक्ष्मीकांत लिगाडे, ओंकार कुलकर्णी,प्रसाद फुले,अमित पोरे, बाळासो चव्हाण, रोहित सावंत, विनोद उबाळे आदी कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा आभार समारोप डॉ.मानस कमलापुरकर यांनी केला.



## स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या युवाआघाडी जिल्हाउपाध्यक्षपदी भोसले

**वेळापूर** : स्वाभिमानी शेतकरी संघटनेत यापुढे निष्क्रिय कार्यकर्त्यांची पदाधिकारी यांची गय केली जाणार नाही. या माजी खासदार राजू शेट्टी यांच्या आदेशानुसार स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या युवा आघाडीच्या सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी सदाशिवनगरचे स्वाभिमानीचे कार्यकर्ते दत्ताभाऊ भोसले व माळशिरस तालुका उपाध्यक्षपदी शिवप्रसाद देशपांडे यांची जिल्हाध्यक्ष तानाजी काका बागल यांच्या मार्गदर्शनाखाली निवड करण्यात आली. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माढा लोकसभा अध्यक्ष कमलाकर तात्या माने देशमुख, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष मदनसिंह जाधव, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष शहाजान भाई शेख, तालुकाध्यक्ष अजित बोरकर, वेळापूर शहराध्यक्ष सचिन पवार इत्यादी उपस्थित होते.




## लोकसहभागातून जि.प.शाळेला स्पीकर संच भेट

**उत्तर सोलापूर** : तालुक्यातील गुळवंची येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेस लोकसहभागातून एक स्पीकर संच भेट देण्यात आला. जिल्हा परिषद शाळेत परिपाठ, महापुरुषांच्या जयंती याबरोबरच विविध कार्यक्रम करण्यासाठी या स्पीकर संचचा उपयोग होणार आहे. स्पीकर संचसाठी गावातील नागरिकांनी एकत्र येत वर्गणी गोळा केली. विद्यार्थ्यांनी खाऊला दिलेले पैसे जमवून दीड हजार रुपये स्पीकर संचासाठी देऊन आपले योगदान दिले.नवीन स्पीकर संचचा नियमितपणे वापर करून मुलांची स्टेज डेअरिंग आणि संवाद कौशल्य याचा विकास करणार असल्याचे मुख्याध्यापक श्रीमती आगाजे यांनी सांगितले.या कार्यक्रमा प्रसंगी इयत्ता तिसरीतील आय टी एस परीक्षेत शंभर टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या श्रीमती साळसकर यांचा सत्कार करण्यात आला.स्पीकर संच शाळेला सुपूर्द करतेवेळी सरपंच दिनेश जगताप, उपसरपंच सागर राठोड, माजी सरपंच विष्णू भोसले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष धनाजी भोसले, पोलीस पाटील तानाजी यादव, कबीर शेख,मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.




## कारंबा येथे विविध कार्यक्रमांनी भाजप वर्धापनदिन साजरा

**उत्तर सोलापूर** : उत्तर तालुक्यातील कारंबा येथे भारतीय जनता पार्टी वर्धापन दिनानिमित्त भाजप प्रदेश कासर्याकरणी सदस्य शहाजी पवार यांच्या हस्ते,स्व दिन दयाल, भारत मातेच्या प्रतिमा पूजनाणे करण्यात आले.यावेळी स्थानिक शेतकऱ्यांना ताडपत्री वाटप, जेष्ट भाजप कार्यकर्त्यांचा सन्मान,औषधे व फवारणी यंत्र वाटप,नुतन सदस्यांचा सत्कार करण्यात आले. यावेळी भाजप उत्तर तालुका अध्यक्ष काशीनाथ कदम, भाजप युवा मोर्चा तालुका अध्यक्ष संभाजी दडे, विनायक सुतार, शिवाजी सोनार, सुहास भोसले, योगेश गवळी, अझर शेख, शिवशंकर नारायणकर, सागर नारायणकर, दिलीप कांबळे, राजेंद्र कांबळे, अशोक कांबळे, तानाजी कांबळे राजू मस्के, आण्णा कांबळे, मधुकर मस्के अनिल बोराडे, दत्तात्रय भडगे, प्रशांत बोराडे, नवनाथ बोराडे, अनंता क्षिरसागर, अनुरथ गुंड, भागवत कत्ते, महेश पेंडपाले, विकास तंबाके, शिवाजी सोनार, हमीद मुलांनी, आबा लामकाने, आप्पा गुंड, विजय बहिर्जे उपस्थित होते.

# महिलांना शेतकरी असल्याचा दाखला

## कृषी आयुक्तांचे निर्देश

सुराज्य/छ. संभाजीनगर

**शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्यावर केंद्र व राज्य सरकारचा भर आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करतेवेळी त्यात महिला शेतकऱ्यांचाही सहभाग राहणे आवश्यक आहे. राज्यात महिलांच्या नावे जमिनीचा सात-बारा असलेल्या महिला शेतकऱ्यांची संख्या अल्प म्हणजे सुमारे १५.४६ टक्के आहे. शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये भागधारक म्हणून सहभागी होण्यासाठी लागणारा शेतकरी असल्याचा दाखला तालुका कृषी अधिकाऱ्यांनी कुटुंबातील कोणत्याही एका व्यक्तीच्या नावे शेती असल्यास त्या कुटुंबातील कोणत्याही अन्य सदस्याला शेतकरी असल्याचा दाखला द्यावा, असे निर्देश कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांनी दिले आहेत. या संदर्भातील परिपत्रक २९ मार्च रोजी कृषी आयुक्तालयाने जारी केले आहे.**

राज्यात ७९.५२ टक्क्यांपेक्षा अधिक शेतकरी अल्प व अत्यल्प भूधारक आहेत. अशा परिस्थितीत वैयक्तिक शेतकऱ्यांनी एकट्याने शेती करण्यापेक्षा शेतकऱ्यांचे गट स्थापन करून गटशेती करणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्यावर केंद्र व राज्य सरकारचा भर आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करतेवेळी त्यात महिला शेतकऱ्यांचाही सहभाग राहणे आवश्यक आहे.

# विसरभोळ्या प्रवाशांना...हरवलेले ते गवसले

## मध्य रेल्वेत सापडलेल्या ५ कोटी रुपये किमतीच्या वस्तू परत

सुराज्य/मुंबई

**घरातून निघताना कार्यालयात वेळेवर 'पंच' करणे असो वा कुटुंबीयांसोबत सुट्टीच्या दिवशी करावयाचा 'लंच' या सगळ्यांचे नियोजन करण्याच्या विचारात लोकलमध्ये बसलेल्या मुंबईकर आपल्या कित्येक वस्तू गाडीत विसरून जातो. गेल्या चार वर्षांत मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाकडे जमा झालेल्या अशा तब्बल पाच कोटी रुपयांच्या वस्तू प्रवाशांना परत करण्यात आल्या आहेत.**

मध्य आणि पश्चिम रेल्वेवरून रोज सरासरी ७५ लाख प्रवासी प्रवास करतात. लोकलमध्ये बेवारस स्थितीत वस्तू आढळल्यास कर्तव्यदक्ष प्रवाशांकडून रेल्वे सुरक्षा दल आणि रेल्वे पोलिसांना त्याबाबतची माहिती दिली जाते. सापडलेल्या वस्तू परस्पर गायब करण्याचे प्रमाण मोठे आहे. यामुळे लोकलमध्ये हरवलेली वा विसरलेली वस्तू पुन्हा मिळेलच, असे होत नाही. मात्र, रेल्वे यंत्रणांकडे जमा केलेली वस्तू नक्कीच प्रवाशांना पोहोचवण्यात येत आहे, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सन २०२२मध्ये मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाकडे २.२८ कोटी रुपयांच्या विविध वस्तू जमा करण्यात आलेल्या होत्या.

प्रवाशांना परत करण्यात आलेल्या वस्तू

| वर्ष | बॅग | मोबाइल | अन्य वस्तू | किंमत (कोटी रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|
| २०१९ | ३०१ | ९१ | ४५२ | १.२४ |
| २०२० | १३७ | ७३ | २५३ | ०. ४६ |
| २०२१ | २३० | ८४ | ३८३ | १.०० |
| २०२२ | ४०३ | २५२ | ७७० | २.२८ |

(स्रोत - मध्य रेल्वे)

यात ८१० रोख रकमांचा देखील समावेश आहे.

तक्रारींची तपासणी केल्यानंतर ४०३ प्रवाशांना बॅग आणि २५२ प्रवाशांना त्यांचे मोबाइल परत करण्यात आलेले आहेत.

२०१९ ते २०२२ या कालावधीत २०२२मध्ये सर्वाधिक हरवलेल्या वस्तू परत करण्यात आलेल्या आहेत. एकूणच धावपळीच्या आयुष्यात वेळेचे गणित जमवताना मुंबईकरांमध्ये विसरभोळेपणा वाढत असल्याचे चित्र अधिक गडद होत आहे.


लोकलमध्ये वस्तू हरवल्यास १३९ किंवा १५१२ या क्रमांकावर संपर्क साधून हरवलेल्या वस्तूची नेमकी माहिती दिल्यानंतर स्थानकातील आरपीएफ आणि पोलिसांकडून ती वस्तू ताब्यात घेण्यात येईल.

# रेमडेसिवीर मात्रेसाठी हवेत काटेकोर निकष

## टास्क फोर्सच्या सूचनेनंतर तज्ज्ञांचे मत

सुराज्य/मुंबई

'तीव्र स्वरूपाची कोरोना संसर्गाची लक्षणे असलेल्या रुग्णांना वैद्यकिय उपचारादरम्यान रेमडेसीवीरच्या तीन इंजेक्शनचा कोर्स देण्यात यावा,' अशा सूचना टास्क फोर्सकडून देण्यात आल्या आहेत. मात्र, या औषधाचा वापर करण्यासंदर्भात मतमतांतरे असून, याचा वापर करण्याबाबत काटेकोर निकष ठरवण्यात यावेत', असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. यापूर्वी ज्या रुग्णांमध्ये या इंजेक्शनचा वापर करण्यात आला आहे, अशा रुग्णांमध्ये ते किती उपयुक्त ठरले, याचे राज्यात संशोधन झालेले नाही. तसेच लक्षणाधारित उपचारपद्धतीमध्ये विविध प्रकारच्या औषधांचा वापर करण्यात आला. त्यामुळे या औषधांच्या परिणामकारकतेसंदर्भात अद्याप सुस्पष्टता नाही. त्यामुळे पुन्हा त्यांचा वापर करायचा का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.



तर राज्याच्या मृत्यू विश्लेषण समितीचे प्रमुख डॉ. अविनाश सुपे यांनी सांगितले की, 'कोणत्याही औषधांच्या वापरासाठी सखोल संशोधनाची गरज असते. यापूर्वी कोरोनासंसर्गाच्या लाटेमध्ये ओमायक्रॉन स्वरूपाच्या विषाणूमुळे होणाऱ्या संसर्गामध्ये मोनोक्लोनल अँटीबॉडीचा वापर वैद्यकिय उपचारपद्धतीमध्ये प्रभावी ठरत होता. तो आता तितका प्रभावी ठरत नसल्याने रेमडेसीवीरचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची शक्यता असावी.'

कोरोना रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉ. दीपक बैद यांनी, हे औषध नेमके कधी द्यायचे यासंदर्भात अधिक स्पष्ट नियमावली असण्याची गरज व्यक्त केली. सध्या संमिश्र स्वरूपाच्या संसर्गाचे प्रमाण वाढते आहे. यापूर्वी न्यूमोनिया नसलेल्या आणि ऑक्सिजनची पातळी कमी न झालेल्या रुग्णांनाही ते देण्यात आले. मात्र, हा प्रकार चुकीचा होता. ते टाळायला हवे. या औषधाबाबत अधिक काटेकोर नियम आले, तर त्याचा वापर जबाबदारीने होईल, असेही डॉ. बैद म्हणाले. तर 'आयएमए'चे माजी अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे यांनी सांगितले की, आता रुग्णालयामध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या अतिशय कमी आहे, तरीही आरोग्यविभागाने या कुप्यांचा साठा करून ठेवला आहे. मागील करोना लाटांच्या वेळी त्याचा तुटवडा असल्याने काळ्या बाजारात ते विकण्यात आले. रुग्ण सांगतात म्हणूनही औषध देण्यात आले. नियोजनातील शिस्तीचा अभाव औषधांचा अपेक्षित परिणाम साध्य करत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

## कणाहीनच फक्त काँग्रेसमध्ये राहू शकतात : आझाद

सुराज्य/नवी दिल्ली

काँग्रेसचे बंडखोर नेते गुलाम नबी आझाद यांच्या 'आझाद' या आत्मचरित्राचे नुकतेच प्रकाशन झाले. या प्रकाशन सोहळ्यानिमित्त त्यांनी माध्यमांशी संवाद साधत असताना काँग्रेसवर कडाडून टीका केली. राहुल गांधी यांच्यामुळेच मला काँग्रेसमधून बाहेर पडावे लागले, असे सांगताना आझाद म्हणाले की, 'काँग्रेसमध्ये आता कणाहीन लोकच राहू शकतात.'

पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलत असताना आझाद म्हणाले की, 'मी एकटाच काँग्रेसमधून बाहेर पडलेला व्यक्ती नाही. माझ्यासारखे अनेक नेते, युवा आणि ज्येष्ठ कार्यकर्ते आहेत जे काँग्रेसमधून बाहेर पडले.'

# राज्यातील कारागृहे कैद्यांनी तुडूंब

## क्षमतेपेक्षा जास्त बंदी

सुराज्य/मुंबई

राज्यातील कारागृह कैद्यांनी तुडुंब भरले असून कैदी ठेवण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. राज्यातील काही मध्यवर्ती व काही जिल्हा कारागृहांत तर दुप्पट कैदी ठेवले जात आहेत.

विशेष म्हणजे महिला कारागृहांत महिला कैदीसुद्धा क्षमतेपेक्षा अधिक ठेवले जात असल्याची माहिती समोर आली आहे. राज्यात असलेली ६० कारागृहे ही सध्या पूर्णतः भरली असून २४ हजार ७२२ कैदी क्षमता असणाऱ्या कारागृहांमध्ये तब्बल ४१ हजारांपेक्षा अधिक कैद्यांना ठेवण्यात आले आहे, अशी माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. दोषी कैद्यांपेक्षा न्यायालयात आरोपपत्र दाखल झालेल्या प्रकरणांमध्ये कैद्यांची संख्या यामध्ये मोठ्या प्रमाणात आहे. तर महत्त्वाची गोष्ट म्हणजे काही कैद्यांचे जामीन घेण्यास



कोणीही पुढे येत नसल्याने असे अनेक कैदी आहेत, जे आजही या कारागृहात खितपत पडले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्यावर्षी अहमदनगर जिल्ह्यातील नारायणडोह आणि पालघर येथे कारागृहे बांधण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. पालघरमध्ये एक हजार इतकी क्षमता असलेली तर नारायणडोह येथे ५०० कारागृहे बांधण्यात येणार आहेत. तर येरवडा आणि ठाणे मध्यवर्ती कारागृहात देखील आणखी तीन हजार कैदी राहतील इतकी कारागृहे बांधण्यात येणार आहे. यासाठीचे नकाशे आणि आराखडे तयार करण्याच्या सूचना पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळाला देण्यात आलेल्या आहेत. तर भुसावळ, हिंगोली आणि गोंदिया येथे कारागृहे बांधण्यासाठीची जागा उपलब्ध झाली असून यासाठीचे काम देखील लवकरच सुरू करण्याची माहिती समोर आली आहे.

# परवडणाऱ्या घरांसाठी सरकार देणार जमीन

## महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे आश्वासन

सुराज्य/नाशिक

**वाढत्या नागरिकरणामुळे शहरात परवडणाऱ्या घरांची आवश्यकता अधिक आहे. बांधकाम व्यावसायिकांनी गोरगरिबांना परवडणाऱ्या घरांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधकाम प्रकल्प राबविल्यास त्यासाठी राज्य सरकार जमिनीसह आवश्यक ती मदत करेल, असे आश्वासन राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.**



क्रेडाई नाशिक मेट्रोच्यावतीने हॉटेल ताज येथे आयोजित पदग्रहण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून विखे-पाटील उपस्थित होते. यावेळी त्यांनी नाशिकच्या विकासावर मत मांडत नाशिकमध्ये गोरगरिबांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी बिल्डरांनी परवडणाऱ्या घरांचे मोठे प्रकल्प उभे करण्यासाठी पुढे आले पाहिजे, असे आवाहन केले. सर्वांना परवडणारे घरे मिळावे यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महसूल विभाग त्यासाठी जमीन देण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी नाशिककरांनी पुढाकार घेऊन पंतप्रधान आवास योजनेचे प्रकल्प राबवावेत. बांधकाम व्यावसायिकांनी अशा प्रकल्पांचे प्रस्ताव सादर केल्यास त्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

वाळू माफियांची लॉबी तोडण्यासाठी आता शासनच लिलाव करून सरकारी डेपोमध्ये ती वाळू ठेवेल. वाळूची किमान किंमत सहाशे रुपये ब्रास ठेवली जाईल. त्यानुसार ट्रान्स्पोर्टचा खर्च धरून जास्तीत जास्त एक हजार रुपये प्रतिब्रास दराने वाळू मिळावी, असे धोरण आहे.

या माध्यमातून वाळू माफियांची साखळी तोडण्याचे शासनाचे प्रयत्न असल्याचे विखेपाटील यांनी सांगितले. दस्तनोंदणीतून राज्य सरकारला सर्वाधिक महसूल मिळतो. त्यामुळे या कार्यालयांतही पासपोर्ट कार्यालयाच्या धर्तीवर नागरिकांना सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

मुद्रांक महासंचालनालयाचा कारभार प्रत्येक इमारतीच्या पहिल्या मजल्यावर आणण्याचे नियोजन आहे. त्यासाठी खासगी क्षेत्राकडे महासंचालनालय सोपविले जाणार असल्याचे ते म्हणाले.

# 'मातोश्री'चा एफएसआय क्लिअर करणारे फडणवीस आता फडतूस कसे?

## मनसे नेत्याचा उद्धव ठाकरेंना सवाल

## उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीसांमध्ये खडाजंगी सुरू

सुराज्य/मुंबई

**शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अलिकडेच ठाण्यात माध्यमांशी बोलताना राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फडतूस म्हटलं. त्यावर संतापलेल्या देवेंद्र फडणवीसांनी 'मी काडतूस आहे, झुकेगा नही, घुसेगा' अशा शब्दात उद्धव ठाकरेंना उत्तर दिलं.**



ठाकरे आणि फडणवीसांमधली खडाजंगी एकीकडे सुरू असताना मनसे नेते प्रकाश महाजन यांनी या दोघांवरही टीकास्त्र सोडलं आहे. प्रकाश महाजन म्हणाले, देवेंद्र फडणवीसांनी, 'उद्या मी बोललो तर महागात पडेल असं काही बोलण्यापेक्षा खरंच काहीतरी बोलावं. महाराष्ट्राच्या जनतेला सर्वकाही कळू द्यावं.'

प्रकाश महाजन म्हणाले की, 'मला बरंच काही माहिती आहे, उद्या मी बोललो तर असं काही फडणवीस यांनी बोलण्यापेक्षा खरंच काहीतरी बोलावं. आमचीदेखील इच्छा आहे तुम्ही बोलावं. जनतेला कळू द्या, त्यांनी तुम्हाला फडतूस म्हटलंय, तुम्ही बोला नेमकं काय बोलायचं आहे ते स्पष्ट बोला.'

# पंतप्रधान मोदी देवदुर्लभ नेतृत्व

## भाजपा स्थापना दिवस कार्यक्रमात देवेंद्र फडणवीसांचे वक्तव्य

सुराज्य/मुंबई

'आपण सत्तेसाठी जन्माला आलो नाही. सत्ता आपल्यासाठी एक साधन आहे. ज्याचा उपयोग करुन सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन करायचं आहे. सामाजिक, आर्थिक लढाईतील एक परिवर्तन म्हणून आपण सत्तेकडे पाहतो, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत आयोजित केलेल्या कार्यक्रमात फडणवीस बोलत होते.'

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात गरिबांसाठी दहा लाख घरांची तरतूद आपण केली आहे. शेतकऱ्यांना १ रुपयांत विमा देत आहोत. सामान्य माणसाला ५ लाखापर्यंत मोफत आरोग्यसेवा देण्याचं आपल्या सरकारने ठरवले आहे. म्हणून समाजात मोठे परिवर्तन करण्याचं काम आपण करत आहोत, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं.

आज भाजपा देशातील सर्व भागात जनतेचा पक्ष म्हणून काम करताना पाहायला मिळतोय. ईशान्य भारतात भाजपाची सरकार स्थापन झाली आहेत. समाजातील सर्व स्तरातील लोकांचा पंतप्रधान मोदींवर विश्वास आहे.

# पाच दिवसांच्या पावसामुळे शेतकऱ्यांना मदत मिळणार नाही

## किसान सभेचा गंभीर आरोप

सुराज्य/मुंबई

**शिंदे-फडणवीस सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत सततचा पाऊस नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना पावसामुळे नुकसान झाल्यास भरपाई मिळणं सोपं होईल, असा दावा सरकारने केला. मात्र, किसान सभेने सरकारचे हे दावे फेटाळत नव्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मदत मिळणार नाही, असा आरोप केला. अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय सहसचिव डॉ. अजित नवलेंनी भूमिका मांडली.**

अजित नवले म्हणाले, सलग पाच दिवस किमान दहा मिलिमीटर पाऊस झाल्यास त्या परिमंडळामध्ये अतिवृष्टी झाली असे गृहीत धरून भरपाई देण्यात येईल, अशा प्रकारचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामुळे शेतकऱ्यांना



अतिवृष्टीत झालेल्या पिकांची नुकसान भरपाई मिळण्यास मदत होईल असा दावा केला जात आहे. मात्र वस्तुस्थिती यापेक्षा वेगळी आहे.

**प्रत्यक्षात शेतकऱ्यांना मदत मिळणार नाही**

राज्य सरकारने केवळ पाच दिवस, सलग १० मिलिमीटर पाऊस झाल्यानंतर त्या परिमंडळात लगेच भरपाई दिली जाईल असा सरळ निर्णय घेतला. याच्या जोडीला आणखीही अतिशय जाचक अटी जोडल्या आहेत. हे अटीशर्तींचे सरकार असल्यामुळे घोषणा करायची, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना मदत मिळणार नाही याची काळजीही घ्यायची हा फडणवीस सरकारचा नेहमीचा कित्ता यावेळीही गिरवण्यात आला आहे, असा आरोप अजित नवलेंनी केला.

# पुन्हा टोलच्या मार्गावर...

## महसूलवाढीसाठी टोलवसुली करण्याचा 'एमएमआरडीए'चा प्रस्ताव

सुराज्य/मुंबई

**विक्रीसाठी भूखंडांची उपलब्धता झपाट्याने संपुष्टात येत आहे. त्यामुळे येत्या काळात महसूल उभा होणे कठीण आहे, अशी व्यथा मांडत टोल वसुली करू द्या, असा प्रस्ताव मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण (एमएमआरडीए) शासनाकडे पाठविणार आहे.**

अनेक वेळा महापालिका, राज्य रस्ते विकास महामंडळ यांची कामेदेखील केली जातात. पूर्णत्वास गेलेले, सुरू असलेले व आगामी काळात होणारे प्रकल्प यांचा खर्च १ लाख १९ हजार ७६४ कोटी रुपये आहे. एवढ्या कामांच्या खर्चास काही स्वरूपात केंद्र सरकारची मदत आहे. पण मुख्यत्वे करून हे सर्व प्रकल्प एमएमआरडीए भूखंड विक्रीतील महसुलातून पूर्ण करीत आहे. एमएमआरडीएला मुख्यत: वांद्रे कुर्ला संकूल (बीकेसी) व वडाळा ट्रक टर्मिनल येथील भूखंड विक्रीद्वारे महसूल मिळतो. मात्र या दोन्ही ठिकाणच्या भूखंडांची उपलब्धता संपुष्टात येत आहे. आता फार भूखंड विक्रीसाठी उपलब्ध नाहीत. या स्थितीत तब्बल १ लाख १९ हजार ७६४ कोटी रुपयांच्या कामांचा खर्च भरून कसा काढायचा असा प्रश्न प्राधिकरणाकडून उपस्थित करण्यात आला.

### अतिरिक्त टोल नाक्यांसाठी प्रयत्न

एमएमआरडीए बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, मुंबईत येण्यासाठी सध्या असलेले टोल राज्य रस्ते विकास महामंडळ संकलित करीत आहे. त्याची मुदत सन २०२७मध्ये संपणार आहे. त्यानंतर ही टोल वसुली एमएमआरडीएकडे सोपवली जावी. तसेच मुंबईच्या विकासासाठी उभ्या होणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी अतिरिक्त टोल नाकेदेखील उभे करण्याची परवानगी द्यावी, असा प्रस्ताव एमएमआरडीएकडून या बैठकीत मांडण्यात आला.




या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीतच अतिरिक्त टोल नाक्यांसाठी एमएमआरडीएने शासनाला प्रस्ताव पाठवावा या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले.

रस्ते विकास महामंडळाकडील मुंबईच्या वेशीवरील टोल नाकेदेखील पुढील काळात एमएमआरडीएकडे सोपविण्याबाबत व्यवहार्य निर्णय घेण्याचा अधिकार महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तसेच एमएमआरडीएचे महानगर आयुक्त यांना बहाल करण्याचा निर्णयदेखील या बैठकीत घेण्यात आला.

# ए. के. अँटनी यांच्या मुलाचा भाजपात प्रवेश

सुराज्य/नवी दिल्ली

काँग्रेस नेते आणि माजी केंद्रीय मंत्री ए. के. अँटनी यांचा मुलगा केरळमधील काँग्रेस नेते अनिल अँटनी यांनी भाजपात प्रवेश केला आहे.

भाजपा नेते पीयूष गोयल, वी. मुरलीधरन आणि केरळचे प्रदेशाध्यक्ष के. सुरेंद्रन यांच्या उपस्थितीत अनिल अँटनी यांनी भाजपात प्रवेश केला.

अनिल अँटनी हे केरळ काँग्रेसचे सोशल मीडिया प्रमुख होते. अलीकडेच 'बीबीसी'ने गुजरात दंगलीबाबत एक माहितीपट प्रदर्शित केला होता. 'इंडिया: द मोदी क्वेश्चन' नावाच्या या माहितीपटातून गुजरात दंगलींमध्ये तत्कालीन गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहेत.

## दुधनी बाजार समिती निवडणूक

# म्हेत्रे गटाचे दोन व्यापारी सदस्य बिनविरोध

### विरोधकांचे प्रयत्न निष्फळ ठरणार : प्रथमेश म्हेत्रे

सुराज्य/अक्कलकोट

**दुधनी मार्केट कमिटीच्या आजवरच्या इतिहासात म्हेत्रे गटाने निर्विवाद वर्चस्व राखले आहे.शेतकऱ्यांचे हित, व्यापाऱ्यांचा विश्वास आणि पारदर्शी कारभार यामुळेच मार्केट कमिटीच्या निर्मितीपासून आजतागायत सत्ता कायम राखण्यात आम्ही यश मिळवले आहे.ही वस्तुस्थिती विरोधकांना माहीत असूनही केवळ राजकारणापोटी षडयंत्र रचत मार्केट कमिटीची निवडणूक लावण्याचा चंग त्यांनी बांधल्याचे दिसून येत आहे. मात्र त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरणार आहेत, असा घणाघात माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे यांनी केला.**

बुधवारच्या छाननीनंतर माजी आमदार सिद्रामप्पा पाटील व आमदार सचिन कल्याणशेट्टी गटाचे ग्रामपंचायत सर्वसाधारण मतदारसंघातील उमेदवार सिध्देश्वर गंगोडा यांचे शेत नसल्याची सतीश प्रचंडे यांनी तक्रार केली. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी गुरुवारी गंगोडा यांचा अर्ज नामंजूर केला. तसेच म्हेत्रे गटातील सातलिंगप्पा परमशेट्टी आणि चंद्रकांत येगदी या दोघांच्या विरोधात एकही अर्ज न भरल्याने व्यापारी मतदार संघातून हे दोघेही बिनविरोध निवडून आले आहेत. यानंतर पत्रकारांशी बोलताना प्रथमेश म्हेत्रे यांनी माहिती दिली.



सभापती प्रथमेश म्हेत्रे म्हणाले की, म्हेत्रे कुटुंबाने मार्केट कमिटीच्या माध्यमातून शेतकरी व व्यापाऱ्यांसाठी आजवर हिताचे निर्णय घेतले आहेत.याचीच पोचपावती म्हणून व्यापाऱ्यांनी दोघांना बिनविरोध केले आहे. येत्या शनिवारी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचा वाढदिवस असुन मार्केट कमिटीच्या व्यापाऱ्यांनी दोघांना बिनविरोध करून अनोखी भेट दिली आहे. व्यापार मतदारसंघातुन विश्वनाथ म्हेत्रे, रेवणसिध्द पाटील, सिध्दाराम येगदी यांनी अर्ज मागारी घेतल्याने आपोआपच उर्वरित दोघे बिनविरोध निवडून आले आहेत.

दुधनी बाजार समितीच्या निवडणुकीसाठी ग्रामपंचायत सर्वसाधारण मतदारसंघासाठी १०, ग्रामपंचायत अनुसूचित जाती जमाती मतदार संघासाठी ५, ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी ४, सहकारी संस्था मतदारसंघ सर्वसाधारण गटासाठी-३१,सहकारी संस्था मतदारसंघ सर्वसाधारण महिला गटासाठी ८,सहकारी संस्था मतदारसंघ इतर मागासवर्ग गट ४,सहकारी संस्था मतदारसंघ भटक्या जाती जमाती ६,व्यापारी मतदार संघातून ५ तर हमाल तोलार संघासाठी ४ असे एकूण ७७ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. अर्जापैकी मायार घेण्याचा गुरुवारी पहिल्या दिवशी व्यापार मतदार संघातून तीन व हमाल आणी तोलार मतदार संघातून दोन असे एकूण ५ जणांनी अर्ज मायारी घेतले.



गुरुवारी पर्यंत ७२ अर्ज शिल्लक होते.दुधनी बाजार समिती साठी ६ एप्रिल ते २० एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत असुन आहे. दुधनी साठी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन प्रकाश नालवार हे काम पाहत आहेत.

दरम्यान दोन उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर दुधनी व पंचक्रोशीत म्हेत्रे समर्थकांनी जल्लोष केला.

**अक्कलकोट बाजार समिती सारखी हालत नको**

सद्यस्थितीत अक्कलकोट तालुक्यात दोन मार्केट कमिटी कार्यरत आहेत.अलीकडच्या काळात दुधनी मार्केट कमिटीकडे शेतकऱ्यांचा मोठा ओढा लागला आहे. याउलट अक्कलकोट मार्केट कमिटीतील नियोजन शून्य व ढिसाळ कारभारामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा प्रचंड सूर दिसून येत आहे.आगामी काळात याचे पडसाद काय असतील हे निवडणुकीनंतर चित्र स्पष्ट होणार आहे.

---

# सोलापूर जनता सहकारी बँकेस २४ कोटी ५० लाखांचा निव्वळ नफा

## अध्यक्ष सुनील पेंडसे यांची माहिती

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जनता सहकारी बँकेने कोविडच्या खडतर काळानंतर बँकिंग क्षेत्रात गगनभरारी घेतली आहे. २०२२ - २३ या गेल्या आर्थिक वर्षात जनता सहकारी बँकेस लेखापरिक्षणपूर्व (पिरीवळींशव) तब्बल २४ कोटी ५० लाखांचा निव्वळ नफा झाल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष सुनिल पेंडसे यांनी पत्रकार परिषदेत दिली.




सोलापूर जनता सहकारी बँकेकडे १८११ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेने ९७४ कोटी रुपयांची कर्जे वितरित केली असून एकूण व्यवसाय २७८५ कोटी रुपयांचा झाला आहे. बँकेचे भाग भांडवल ७०.८९ कोटी रुपये आहे. तर बँकेची निव्वळ संपत्ती १३७ कोटी रुपये आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमांनुसार भांडवल पर्याप्तता (सीआरएआर) १२ टक्के असणे अपेक्षित आहे. मात्र सोलापूर जनता सहकारी बँकेने यातदेखील आघाडी घेतली असून बँकेची भांडवल पर्याप्तता १६.९७ टक्के आहे. त्यामुळे बँकेच्या भांडवलाची स्थिती उत्तम असल्याचेही अध्यक्ष पेंडसे म्हणाले.यंदा सोलापूर जनता सहकारी बँकेने ४३.५७ कोटी रुपयांचा ऑपरेटिंग नफा मिळवला आहे. तर बँकेच्या नेट एनपीएमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत मोठी घट होऊन नेट एनपीए ४.२८ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे.

सोलापूर जनता सहकारी बँकेने दिलेले कर्जाचे व्याजदर इतर बँकांच्या तुलनेत कमी आहेत. त्यामुळे ग्राहकांना मोठा फायदा होत आहे. नवीन वाहन खरेदी व गृहकर्जदेखील ८.३० टक्क्यांपासून देण्यात आल्यामुळे ग्राहकांना बँकेकडून अनोखी भेट मिळाली आहे. कोविड महामारीच्या काळात एकूणच बँकिंग क्षेत्राला मोठा आर्थिक फटका बसला होता. यातून मार्ग काढत सोलापूर जनता सहकारी बँकेने यंदा २४.५० कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला आहे, असेही अध्यक्ष पेंडसे म्हणाले.

या पत्रकार परिषदेत सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनिल पेंडसे, उपाध्यक्ष ड. मिलिंद कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी, संचालक वरदराज बंग, प्राचार्य गजानन धरणे, तज्ञ संचालक ड. प्रदीपसिंह राजपूत, सी. ए. गिरीष बोरगावकर, मुकुंद कुलकर्णी, दत्तात्रय कुलकर्णी, पुरूषोत्तम उडता, विनोद कुचेरिया, जगदीश भुतडा, आनंद कुलकर्णी, राजेश पवार, बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य डॉ. अजित देशपांडे, पेंटप्पा गड्डम, सी ए. राजेंद्र बुरा, मुख्य कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

**यंदा सभासदांना लाभांश देण्याचा मानस**



सोलापूर जनता सहकारी बँकेच्या सभासदांना लाभांश देण्याबाबत बँकेचे संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. याबाबत रिझर्व बँक ऑफ इंडिया सोबत पत्रव्यवहार करण्यात येणार असून लवकरच सकारात्मक निर्णय होईल अशी अपेक्षा आहे, असे सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी यावेळी सांगितले.

---

## परंड्यात ८ एप्रिल रोजी सावरकर गौरव यात्रेचे आयोजन

**परंडा :** ज्वलंत हिंदुत्वाचे विचारक, राष्ट्रप्रेमाचे प्रतीक असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या गौरवार्थ संपूर्ण महाराष्ट्रभर भारतीय जनता पार्टी-शिवसेना यांच्या वतीने सावरकर गौरव यात्रा काढण्यात येत आहे. ही यात्रा दिनांक ८ एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजता परंडा येथे येत आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात सावरकर गौरव यात्रेचे आगमन होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात सावरकर गौरव यात्रेचे भव्यदिव्य स्वागत करण्यात येणार आहे. यात्रा तेथून पुढे आठवडी बाजारतळ, मंडई पेठ मार्गे जाणार असून कल्याणसागर बँके जवळील नवीन श्रीराम मंदिरात या यात्रेचा समारोप होईल. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कार्यावर,राष्ट्र निष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या बांडगुळांना या गौरव यात्रेतून उत्तर देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपा तालुकाध्यक्ष राजकुमार पाटील, अण्णासाहेब जाधव, शिवसेना शहरप्रमुख बाळासाहेब गायकवाड, युवा मोर्चा शहराध्यक्ष डॉ.संदीप शेळके, युवासेना तालुकाप्रमुख राहुल डोके, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अनिल पाटील, युवासेना शहरप्रमुख वैभव पवार, भाजपा महिला मोर्चा शहर अध्यक्ष ज्योती भातलवंडे यांनी केले आहे.

---

## ग्रामीण पोलीस दलात दोन महिला अधिकारी रुजू

**सोलापूर :** पोलीस दलाच्या प्रशिक्षणानंतर परिविक्षाधिन अधिकारी म्हणून नयोमी साटम यांची सहाय्यक पोलीस अधिक्षक म्हणून तर रोहिणी बानकर यांची प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधिक्षक म्हणून नियुक्ती झाल्याचे पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी सांगितले. भारतीय पोलीस सेवेचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर पोलीस दलाच्या कार्याचा प्रत्यक्ष अनुभव यावा म्हणून जिल्हा पातळीवरील पोलीस दलात अधिकाऱ्यांना पाठवण्यात येते. ६ महिने त्यांना विविध पातळीवर प्रशिक्षणाचा अनुभव देण्यात येतो.प्रत्यक्ष काम करण्याची संधी त्यांना मिळते. त्याच पार्श्वभूमीवर मूळच्या कोकणातील परंतु मुंबईत राहात असलेल्या नयोमी साटम यांनी नुकतेच भारतीय पोलीस सेवेचे प्रशिक्षण हैदराबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल पोलीस ॲकॅडमी येथे पूर्ण केले असून,त्यांना सहाय्यक पोलीस अधिक्षक म्हणून नियुक्ती मिळाली आहे.तर महाराष्ट्र पोलीस सेवेचे प्रशिक्षण पूर्ण करून रोहिणी बानकर यांना सहाय्यक पोलीस उपअधिक्षक म्हणून नियुक्ती मिळाली आहे.



## तरुणाच्या डोक्यात घातला लोखंडी रॉड

**सोलापूर :** माझ्या आईला शिवीगाळ का करता असा जाब विचारल्याने तरूणाच्या डोक्यावर लोखंडी रॉड घातला. याप्रकरणी विजापूर नाका पोलिसात चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ४ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान विजापूर नाका झोपडपट्टी नं १ येथे घडली. घराजवळ असणाऱ्या एक वृद्ध आजी रवींद्रनाथ कल्याणप्पा शेवटे (वय-४८,रा. विजापूर नाका झोपडपट्टी नं १) यांच्या पत्नीला शिवीगाळ करत होती. त्याचा जाब विचारण्यासाठी रविंद्रनाथ यांचा मुलगा रोहित याने वृद्ध आजीला याचा जाब विचाला. त्यावेळी तेथील तीन अनोळखी इसमांनी रोहित याला हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली तसेच एकाने लोखंडी रॉड रोहित याच्या डोक्यात घालून जखमी केले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहेत.

## कारची दुचाकीला धडक; एकावर गुन्हा

**सोलापूर :** कारने दुचाकीला धडक दिल्याने एकजण जखमी झाला. याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला. अनिरुद्ध जालंदर चन्ना (वय-२५, रा.भद्रावरती पेठ) यांचे वडील हे त्यांच्या मोटारसायकलीवरून (क्रमांक एम.एच.१३.सीई. ०६३९) वल्याळ मैदान येथे जात होते. त्यावेळी चार चाकी वाहन चालकाने (एम.एच.११. बीवी.६८६८) वाहन निष्काळजीपणे वाहन चालून चन्ना यांच्या मोटरसायकलीला धडक दिली.ही घटना दि.२ एप्रिल रोजी रात्री पावणे आठ वाजण्याच्या दरम्यान तानाबाना चौक येथे घडली. याप्रकरणी अनिरुद्ध चन्ना यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. रतनचंद बाबुराव शिंदे (रा.बोरामणी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

## सिव्हिल हॉस्पिटलमधून दुचाकी पळवली

**सोलापूर :** सिव्हिल हॉस्पिटल येथील बी ब्लॉक येथे दुचाकी क्र.एम.एच.१३.सीएच.१०६१ ही पार्क करून ठेवली असता, चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना दि.३१ मार्च ते १ एप्रिल २०२३ दरम्यान घडली. याप्रकरणी अ.रहिम हसन हवालदार (रा. राहुल गांधी झोपडपट्टी) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार इनामदार हे करीत आहेत.

---

# पालकमंत्री विखे-पाटील शनिवारी सोलापूर दौऱ्यांवर

सुराज्य/सोलापूर

जिल्हाचे पालकमंत्री तथा महसुल पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय मंत्री राधाकृष्ण विखे पाटील सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. शनिवारी दुपारी त्यांचे आगमन होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालात विविध बैठक घेऊन विकास कामांचा आढावा घेणार आहेत. शनिवारी त्यांचा शासकीय विश्रामगृह येथे मुक्कम असून रविवारी सकाळी विमानाने अहमदनगरला रवाना होणार आहेत. पालकमंत्री शनिवारी सकाळी ९ वाजता सांगोला जिल्हामध्ये आगमन होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता सांगोला येथील ग.दि. माडगुळकर प्रशाला येथे होणाऱ्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन उपस्थिती राहणार आहेत. दुपारी १ वाजता भाजपाचे सांगोला तालुका अध्यक्ष चेतनसिंह केदार - सांवत यांच्या वासुद रोडवरील निवास्थानी भेट देणार आहेत. त्यानंतर दुपारी दोन वाजता सोलापूर विमानतळावर आगमन होणार आहे. दुपारी २.४५ ते ५.३० वजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात स्मार्ट सिटी, सोलापूर विकास आरखडा, सोलापूर विद्यापिठ येथे अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळा उभारण्या संदर्भात विद्यापिठ समितीची बैठक घेणार आहेत.



तसेच प्रशासकीय विभागाच्या आर्थिक विषयाचे नियोजन विविध कामांचा आढवा घेणार आहेत. त्यानंतर शासकीय विश्रामगृह येथे राखिव वेळेत राजकीय मंडळी आणि संघटनाची भेट घेणार आहे. रविवारी सकाळी विमानाने अहमदनगर कडे रवाना होणार आहेत.


## सात रस्ता परिसरातून वृत्तपत्राचे गट्ठे पळवले

**सोलापूर :** सात रस्ता हूमा मेडिकलच्या बाजूला एका वृत्तपत्राचे एकूण १७५२ अंक असलेले एकूण १८ गठ्ठे चोरट्याने चोरून नेल्याची घटना दि.५ एप्रिल रोजी चार ते साडेचार वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी अभिजीत अमरनाथ जाधव (वय-३४,रा.अवंती नगर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक सरतापे हे करीत आहेत.

---

# शहरात आणखी नवे ११ कोरोना रूग्ण

**सोलापूर :** शहरात दिवसेंदिवस कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे. गुरुवारी प्राप्त झालेल्या अहवालानुसार ११ नव्या कोरोना रुग्णांची भर पडली आहे. सोलापूर शहरातील रुग्णसंख्या आता ३६ वर पोहोचली आहे. दरम्यान, बुधवारी १८० रुग्णांची कोरोना टेस्ट करण्यात आली.



त्यापैकी १६९ जणांचा अहवाल निगेटिव्ह तर ११ जणांचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. बाळे, दाराशा, नई जिंदगी, रामवाडी, शेळगी, सोरेगाव येथे कोरोनाचे नवे रुग्ण आढळले. ० ते १५ वयोगटातील ३, १६ ते ३० वयोगटातील १, ३१ ते ५० वयोगटातील ४, ५१ ते ६० वयोगटातील २ व ६० वर्षापुढील १ रुग्णाचा समावेश आहे. काल बरे होऊन गेलेल्या बाधितांची संख्या १५ एवढी आहे. गुरुवारच्या अहवालात मृत व्यक्तींची नोंद झाली नाही. आजपर्यंत पॉझिटिव्ह आलेल्या बाधितांची संख्या ३४ हजार ६९६ एवढी आहे तर मृतांची संख्या १ हजार ५१९ एवढी आहे. रुग्णालयातून बरे होऊन गेलेल्यांची आतापर्यंतची संख्या ३३ हजार १४१ एवढी आहे.



दैनिक 'सुराज्य' कार्यालयास 'टीडीएम' या चित्रपटाच्या टीमने भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत व्यवस्थापकीय संपादक रोनित टोळ्ये यांनी केले. त्यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे, अभिनेता पृथ्वीराज थोरात, अभिनेत्री कालिंदीने निस्ताने, शितल पाटील, अतुल लोखंडे, ओंकारस्वरूप बगाडे, इद्रभान कऱ्हे, पत्रकार रोहन नंदाने आदी.

---

# शहरात हनुमान जयंती उत्साहात साजरी

### पवन सूत हनुमान की जय, जय हनुमानचा जयघोषात भाविकांची मंदिरामध्ये गर्दी

सुराज्य/सोलापूर

**पवन सूत हनुमान की जय, बोल बजरंग बली की जय, जय हनुमानच्या जयघोषात रामनवमीनंतर येणाऱ्या हनुमान जन्मोत्सव सोलापूर शहरात सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शहरातील जवळपास सर्वच हनुमान मंदिरात भाविकांनी संपूर्ण दिवसभर दर्शनासाठी गर्दी केल्याचे दिसून आले.**

सोलापूर शहरात पूर्वीपासूनच हनुमान जयंती मोठ्याप्रमाणात साजरी करण्यात येते. सर्व मंदिरात हनुमानाच्या मूर्तीस महाअभिषेक, हनुमान चालिसा पाठ, रामनामाचा जप व आरती करून विधिवत पूजा करण्यात आली. याचबरोबर सूर्योदयाच्या वेळी सकाळी सहा वाजता उपस्थित भाविकांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी करून व पाळणा हलवून संकटमोचन हनुमान की जय, जय श्रीराम'च्या जयघोषातील भक्तिमय वातावरणात हनुमान जन्मोत्सवाचा सोहळा पार पडला. गव्हाची खीर व सांबर भाताच्या महाप्रसादाचे वाटप भाविकांना करण्यात आले.

शहरातील काळजापूर मारूती मंदिरात तर सकाळपासून भाविकांची गर्दी दिसून आली. दिवसभरात जवळपास ५० हजार भाविकांनी मारूतीचे दर्शन घेतले. याशिवाय सोन्या मारूती मंदिर, बाळीवेस येथील मारूती मंदिर, मधला मारूती मंदिर, लक्ष्मी-विष्णू मिलमधील मारूती मंदिरासह सर्व ठिकाणी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

विजापूर रोड परिसरातील जुना विजापूर नाका येथील उत्तर मुखी श्री जागृत मारुती मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलं होते.

गुरुवारी पहाटे चार वाजता महारुद्राभिषेक, पहाटे पाच वाजता विविध धार्मिक कार्यक्रमांचा आयोजन तसेच सकाळी सहा वाजता अत्यंत मंगलमय अशा वातावरणात पाळणा आणि गुलालाचा कार्यक्रम भक्तगणांच्या उपस्थितीत पार पडला. मंदिराचे पुजारी सिद्धय्या यांनी सर्व विधी केले. सायंकाळी पालखी काढण्यात आली.





**हिंदु जनजागृती समितीतर्फे गदा पूजन**

हनुमान जयंतीच्या निमित्ताने हिंदु जनजागृती समिती आणि समविचारी हिंदुत्वनिष्ठ संघटना यांच्या वतीने सोलापूर शहरासह जिल्ह्यात ८५ ठीकाणी गदापूजन' करण्यात आले या वेळी शंखनादाने कार्यक्रमाला आरंभ करण्यात आला. त्यानंतर सामूहिक प्रार्थना, गदापूजन' विधी, श्री हनुमानाची आरती, स्तोत्र आणि श्री हनुमते नम:' हा सामूहिक नामजप करण्यात आला. कार्यक्रमाला हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे तसेच विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने युवावर्ग उपस्थित होता.

**अमर जांबवीर तरूण मंडळ**

अमर जांबवीर तरूण मंडळच्या वतीने हनुमान जयंतीनिमित्त भव्य मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणुकीचा शुभारंभ सिध्देश्वर साखर कारखानाचे चेअरमन धर्मराज काडादी, सदर बझार पोलीस स्टेशनचे निरीक्षक क्षीरसागार, डॉ शैलेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मंडळाचे आधारस्तंभ दत्ता दोडमनी, अध्यक्ष अमर हळ्ळी, मार्गदर्शक अंबादास करगुळे, शाम मरेड्डी, मल्लु म्हेत्रे यांच्यासह कोनापुरे चाळीतील नागरिक उपस्थित होते.

**विजापूर रोड**

विजापूर रोड परिसरातील जुना विजापूर नाका येथील उत्तर मुखी श्री जागृत मारुती मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलं होते. गुरुवारी पहाटे चार वाजता महारुद्राभिषेक, पहाटे पाच वाजता विविध धार्मिक कार्यक्रमांचा आयोजन तसेच सकाळी सहा वाजता अत्यंत मंगलमय अशा वातावरणात पाळणा आणि गुलालाचा कार्यक्रम भक्तगणांच्या उपस्थितीत पार पडला. मंदिराचे पुजारी सिद्धय्या यांनी सर्व विधी केले. सायंकाळी पालखी काढण्यात आली.

**द्वारकाधीश मंदिर**

जुळे सोलापुरातील द्वारकाधीश मंदिरात हनुमान जयंती साजरी करण्यात आली. 'दिरात देखील हनुमान चालीसा पठनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सर्वांनी मिळून ११ वेळा पाठ महिन्याचा संकल्प केला. यावेळी ट्रस्टी जयेशभाई पटेल, विपिनभाई पटेल यांच्यासह भाविक उपस्थित होते.